एकमेव स्वतंत्र दैनिक
# नवाकाळ
NAVAKAL

• मुंबई, सोमवार २७ एप्रिल, २०२६ • वर्ष-१०४, अंक-५३, पाने-८, किंमत: ₹ ७
• R.N.I.No.1814/57 • Vol.- 104, Issue - 53 Marathi - Daily - Mumbai, 27 April, 2026 Page - 8 Price- Rs. 7/-
• संपादक- रोहित रमाकांत पांडे | 24x7 : www.navakal.in | Email- contact@navakal.in

नवाकाळच्या Digital बातम्या पाहण्यासाठी Scan करा!
ट्रम्प यांच्यावर गोळीबार करणारा 'तो' नक्की होता कोण?
navakal.in
@navakal.news Navakal Digital Network @_NDN_Offical @NavakalNews

# अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्यावर गोळीबार
# थोडक्यात बचावले! मंत्रिमंडळच ठार करण्याचा कट

**अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प उपस्थित असलेल्या हिल्टन हॉटेलमधील विशेष आयोजित डिनर कार्यक्रमात दोन गन आणि आठ काडतुसे घेऊन एक हल्लेखोर शिरला. हा हल्लेखोर तिथेच ट्रम्पचे संपूर्ण मंत्रिमंडळ ठार करणार होता. ट्रम्पचे सात स्तरांचे सुरक्षा कवच तोडून तो ट्रम्प आणि मंत्र्यांच्या अगदी जवळ पोहोचला होता. त्याने सात गोळ्याही झाडल्या. सुदैवाने तो आणखी पुढे येण्यापूर्वीच रक्षकांनी त्याला जेरबंद केले आणि ट्रम्प बचावले.**





ट्रम्प यांनी स्वत: पोस्ट केलेला हल्लेखोराचा फोटो

### हल्ला खरा की बनाव?

या हल्ल्यापूर्वी कार्यक्रमाची माहिती देताना प्रेस सचिव कोरोलिना लेविट म्हणाल्या की, आज डिनरवेळी ट्रम्प खास भाषण करणार आहेत, ते मजेशीर बोलतील. थोडा गोळीबारही करतील. हा व्हिडिओ व्हायरल झाला आहे. इराणने या वक्तव्याला महत्त्व देत हा हल्ला खरा होता की सहानुभूती मिळवायला ट्रम्प यांनी हे नाटक घडवून आणले असा सवाल केला. एक सामान्य तरुण एकट्याने दोन गन, चाकू, काडतुसे घेऊन येतो, ट्रम्प यांची सात स्तरांची सुरक्षा तोडतो आणि इतक्या जवळ येऊन गोळीबार करू शकतो यावर अनेकांचा विश्वास बसत नसल्याने हे रचलेले नाटक आहे अशीही चर्चा आहे.

■ वॉशिंग्टन

**या गोळीबारानंतर** ट्रम्प व फर्स्ट लेडी मेलिना यांना सुरक्षा रक्षकांनी घेरले आणि तिथून ताबडतोब हलवण्यात आले. त्यांना कुठलीही इजा झाली नाही. या घटनेने जगभर खळबळ उडाली आहे. हल्ल्यानंतर काही मिनिटांत ट्रम्प यांनी पत्रकार परिषद घेतली. आम्ही अशा हल्ल्यांनी डगमगत नाही हे त्यांना दाखवायचे होते. ट्रम्प म्हणाले की, हा अमेरिकेच्या संविधानावरील हल्ला आहे. सुरक्षा रक्षकांनी चांगले काम केल्याने बचावलो. पण इराणने हा हल्ला घडविला असेल असे वाटत नाही. ट्रम्प यांच्यावरील गेल्या दहा वर्षांतील हल्ल्याचा हा नववा प्रयत्न आहे.

वॉशिंग्टनमधील हिल्टन हॉटेलच्या बँक्वेट हॉलमध्ये वार्षिक व्हाईट हाऊस कॉरस्पाँडंट डिनरचे आज आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात » पान ७ वर

## थोडक्यात...

### २०२७ मध्ये राष्ट्राध्यक्ष मॅक्रॉन राजकारणातून निवृत्त होणार

**पॅरिस -** फ्रान्सचे राष्ट्राध्यक्ष इमॅन्युएल मॅक्रॉन यांनी राजकीय निवृत्तीची घोषणा केली. निकोसियामधील विद्यार्थ्यांशी बोलताना त्यांनी मी २०२७ मध्ये राजकारणातून पूर्णपणे निवृत्त होणार असल्याचे जाहीर केले. या घोषणेमुळे फ्रान्सच्या राजकीय पटलावर 'महाभूकंप' झाल्याची चर्चा सुरू झाली आहे. राष्ट्राध्यक्ष होण्यापूर्वी मी



राजकारणात सक्रिय नव्हतो आणि आपला कार्यकाळ संपल्यानंतरही राजकारणात सक्रिय राहणार नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले. त्यांनी तूर्तास आपल्या भविष्यातील नेमक्या योजना उघड केल्या नसल्या तरी ते सक्रिय राजकारणातून दूर होऊन खासगी जीवन किंवा इतर कामांमध्ये लक्ष घालतील असे दिसत आहेत. मॅक्रॉन यांचा राजकीय उदय फ्रेंच इतिहासात उल्लेखनीय ठरला आहे. १९५८ मध्ये पाचव्या प्रजासत्ताकाच्या स्थापनेनंतरचे सर्वात तरुण राष्ट्राध्यक्ष म्हणून ते २०१७ मध्ये वयाच्या ३९ व्या वर्षी फ्रान्सचे राष्ट्राध्यक्ष बनले. २०२२ मध्ये ते पुन्हा निवडून आले असले तरी फ्रेंच राज्यघटनेनुसार त्यांना सलग तिसऱ्यांदा निवडणूक लढवण्यास मनाई आहे.

### ठाणे जिल्ह्यात जनगणनेची व्यापक पूर्वतयारी सुरू

**ठाणे -** देशामध्ये १५ वर्षांनंतर होणाऱ्या आगामी जनगणनेसाठी ठाणे जिल्हा प्रशासनाने व्यापक पूर्वतयारी सुरू केली आहे. ही जनगणना पूर्णपणे डिजिटल असणार असून, त्यासाठी प्रशासनाने कंबर कसली आहे. जनगणनेच्या पहिल्या टप्प्यातील घरयादी आणि घरगणना कामासाठी





जिल्ह्यातील ९ चार्ज अधिकारी कार्यालयांमध्ये प्रगणक व पर्यवेक्षकांचे प्रशिक्षण सुरू झाले आहे. या सलग सत्रांमध्ये नियुक्त कर्मचाऱ्यांना जनगणनेच्या संपूर्ण डिजिटल कार्यपद्धतीचे सखोल मार्गदर्शन केले जात असून, आधुनिक तंत्रज्ञानाच्या सहाय्याने ही प्रक्रिया कशी पार पाडायची, याचे धडे दिले जात आहेत. ठाणे जिल्ह्यात १६ मे ते १४ जूनदरम्यान घरयादी आणि घरगणना मोहीम राबविली जाणार आहे. तरी आपल्याकडे येणाऱ्या प्रगणकांना वस्तुनिष्ठ आणि अचूक माहिती देऊन सहकार्य करावे, असे आवाहन ठाणे जिल्हाधिकारी तथा प्रधान जनगणना अधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांनी केले आहे.

## जखमी इराणी नेता खामेनीचा अखेर मृत्यू? 'शहिदां'त झळकले



**इराणचे सर्वोच्च धार्मिक नेते मोजताबा खामेनी अमेरिका-इस्त्रायलविरुद्ध सुरू असलेल्या युद्धात मारले गेल्याची चर्चा इराणच्या मशहद शहरामध्ये झळकलेल्या एका भित्तीचित्रामुळे जगभरात सुरू झाली आहे. या भित्तीचित्रामध्ये युद्धात मरण पावलेल्या शहिदांची छायाचित्रे रेखाटण्यात आली आहेत. त्यामध्ये मोजताबा यांच्याही छायाचित्राचा समावेश आहे. इराणने अधिकृतपणे याबद्दल काही माहिती दिलेली नाही.**

■ तेहरान

**इराण विरूद्ध** इस्त्रायल आणि अमेरिकेने युद्ध छेडल्यानंतर अमेरिकेने केलेल्या क्षेपणास्त्र हल्ल्यात इराणचे तत्कालीन सर्वोच्च धार्मिक नेते आयातुल्ला खोमेनी मारले गेले. त्यांच्या पश्चात मोजताबा खामेनी यांना नवे सर्वोच्च धार्मिक नेते नियुक्त करण्यात आले.

मात्र, आयातुल्ला खोमेनींवर झालेल्या हल्ल्यात मोजताबासुध्दा गंभीर जखमी झाल्याचे सांगितले जात होते. इराणने मोजताबा यांच्या प्रकृतीबाबत आतापर्यंत अधिकृतपणे कुठलीही माहिती दिलेली नाही. काही वृत्तपत्रांनी मोजताबा यांच्या चेहऱ्यावर गंभीर जखम झाल्याचा दावा केला होता. तर त्यांच्या मेंदूला मार लागल्याने ते कोमामध्ये गेल्याचेही म्हटले जात होते.

मोजताबा यांच्याबद्दल उलटसुलट बातम्या प्रसिद्ध असताना इराणने त्यांच्याबद्दल कमालीची गुप्तता पाळली. त्यामुळे त्यांचे नेमके काय झाले, हे रहस्यच बनले होते. परंतु मशहद शहरात मोजताबा यांचे छायाचित्र शहिदांच्या छायाचित्रांसोबत लावण्यात आले आहे.

सोशल मीडियावर याचा व्हिडिओ व्हायरल झाला असून, त्यामध्ये भित्तीचित्रात मोजताबा यांचा फोटो स्पष्ट दिसत आहे. त्यामुळे त्यांचा मृत्यू झाला आहे का, अशी चर्चा सुरू झाली आहे. मात्र, या व्हिडिओबद्दल किंवा मशहद शहरातील भित्तीचित्राबद्दल इराण सरकारने कोणतीही अधिकृत प्रतिक्रिया दिलेली नाही.

## २०२७ ची डिजिटल जनगणना १.२० कोटी घरांची नोंदणी पूर्ण

■ नवी दिल्ली

**पंतप्रधान** नरेंद्र मोदी यांनी 'मन की बात' कार्यक्रमात देशातील २०२७ च्या डिजिटल जनगणनेबाबत महत्त्वाची

### 'मन की बात'मध्ये मोदींची माहिती

माहिती दिली. जगातील सर्वात मोठी जनगणना मोहीम सुरू असून आतापर्यंत १ कोटी २० लाख घरांची नोंदणी पूर्ण झाल्याचे त्यांनी सांगितले. तसेच नागरिकांसाठी स्व-गणनेची सुविधाही उपलब्ध करण्यात आल्याचे मोदींनी स्पष्ट केले.

नरेंद्र मोदी म्हणाले की, यावेळची जनगणना पूर्णपणे डिजिटल पद्धतीने होत असून, माहिती थेट मोबाईल ॲपद्वारे नोंदवली जात आहे. जनगणना कर्मचारी घरोघरी जाऊन नागरिकांची माहिती डिजिटल माध्यमातून संकलित करत आहेत. त्यामुळे प्रक्रिया अधिक जलद, अचूक आणि पारदर्शक होणार आहे. यावेळी नागरिकांसाठी 'स्व-गणना'ची सुविधाही उपलब्ध करून दिली आहे. कर्मचारी घरी येण्याच्या १५ दिवस आधी नागरिक स्वतः ऑनलाईन माहिती भरू शकतील. » पान ७ वर

## यावर्षीही पाऊस लवकर येणार २५ मे पर्यंत केरळात आगमन

■ पुणे

### एल निनोचा प्रभाव नाही

**देशभरात** एप्रिल महिना सुरू झाल्यापासून उन्हाचा तडाखा वाढला असून, अनेक राज्यातील तापमान ४३ ते ४४ अंशांपर्यंत पोहोचले आहे. परंतु प्रखर उष्णतेने हैराण झालेल्या नागरिकांसाठी एक दिलासादायक माहिती समोर आली आहे. यावर्षीही मान्सून वेळेआधी भारतात दाखल होण्याची शक्यता आहे. नैऋत्य मोसमी पाऊस २५ मे च्या आसपास केरळमध्ये दाखल होणार असल्याचा अंदाज भारतीय हवामान विभाग आणि



युरोपियन हवामान एजन्सीने वर्तविला आहे.

युरोपियन सेंटर फॉर मीडिया रेंज वेदर फोरकास्टच्या अंदाजानुसार, नेहमीच्या १ जूनच्या तारखेऐवजी यावर्षी मान्सून २५ मे च्या आसपास केरळमध्ये पोहोचण्याची शक्यता आहे. त्याआधी १८ ते २५ मे पर्यंत मान्सूनचे अंदमान आणि निकोबार बेटांवर आगमन होण्याचे संकेत आहेत. अरबी समुद्रात पश्चिमेकडील वारे मजबूत होत असल्याने बाष्प वाढणार आहे. त्यामुळे मान्सून लवकर येण्यास मदत होणार आहे. यावर्षी एल निनोची शक्यता कमी असल्याने मान्सूनसाठी अनुकूल परिस्थिती आहे. गेल्या काही वर्षांपासून मान्सूनच्या आगमनात सातत्याने » पान ७ वर

## केईएम रुग्णालयाच्या नामांतराला 'मार्ड' संघटनेचा तीव्र विरोध

■ मुंबई

**मुंबईतील** ऐतिहासिक केईएम (किंग एडवर्ड मेमोरियल) रुग्णालयाच्या नामांतराला निवासी डॉक्टरांची संघटना केईएम 'मार्ड'ने कडाडून विरोध केला आहे. रुग्णालयाचे नाव बदलण्याचा निर्णय अत्यंत निराशाजनक आहे. नाव बदलण्याऐवजी रुग्णालयातील मुख्य समस्या सोडवा, अशी मागणी 'मार्ड'ने केली आहे.

केईएम रुग्णालय ही केवळ एक वास्तु नसून तो एक ऐतिहासिक वारसा आहे. ज्याचे शैक्षणिक, वैद्यकीय आणि सार्वजनिक महत्त्व आहे, असे 'मार्ड'ने प्रसिध्द केलेल्या पत्रकात म्हटले आहे.

सविस्तर वाचण्यासाठी व शेअर करण्यासाठी हा क्युआर कोड स्कॅन करा

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या नागरी आरोग्य समितीने शुक्रवारी केईएम रुग्णालयाचे नाव बदलून 'कौशल्यश्रेष्ठ एकलव्य मेमोरियल रुग्णालय' असा प्रस्ताव मंजूर केला आहे. हा प्रस्ताव आता प्रशासकीय मंजुरीसाठी पालिका आयुक्तांकडे पाठवण्यात येणार आहे. प्रशासनाने हा प्रस्ताव फेटाळून लावावा आणि त्याऐवजी रुग्णसेवा आणि डॉक्टरांच्या कल्याणासाठी आवश्यक सुधारणा कराव्यात, अशी मागणी मार्डने केली आहे.

## बीड जेल ऑडिओ प्रकरणी १० जणांचे जबाब नोंदवले

■ बीड

**बीड** जिल्हा कारागृहातील कथित व्हायरल ऑडिओ क्लिप प्रकरणाची गंभीर दखल घेत कारागृह विभागाच्या राज्य दक्षता पथकाने चौकशी सुरू केली असून, आतापर्यंत १० जणांचे जबाब नोंदवले आहेत. कैद्यांना मारहाण, व्हीआयपी सुविधा देणे आणि जबाब बदलण्यासाठी दबाव टाकल्याचा आरोप या ऑडिओत करण्यात आला होता. मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणातील आरोपी वाल्मिक कराड टोळीच्या संदर्भातील आरोपांनंतर राज्य दक्षता पथक बीडमध्ये दाखल झाले असून, पथकप्रमुखांनी कारागृहाची प्रत्यक्ष पाहणी केली. पहिल्या ऑडिओ क्लिपमध्ये अजहर पठाण या कैद्याने मारहाणीचा आरोप केला होता. दुसऱ्या क्लिपमध्ये त्याने 'यू-टर्न' घेत दबावाखाली विधान केल्याचे सांगितले. तर तिसऱ्या क्लिपमध्ये आणखी एक आरोपी सनी आठवले याने मारहाणीचा आरोप केला आहे.

## नवी मुंबई महापालिकेत ८० मराठी शाळा बंद करण्याचा प्रस्ताव

■ नवी मुंबई

**नवी मुंबई** महानगरपालिकेच्या शिक्षण रूपांतरण धोरण-२०२६ वरून मोठा वाद निर्माण झाला असून, सुमारे ८० मराठी शाळांच्या भवितव्यावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले

### उच्च न्यायालयात याचिका

आहे. इंग्रजी माध्यमाच्या शाळांना प्राधान्य देणारा प्रस्ताव बहुमताने मंजूर झाल्याने विरोधकांनी तीव्र आक्षेप घेतला आहे. या निर्णयाविरोधात शिंदे गटाने आक्रमक भूमिका घेतली असून, उपनेते व विरोधी पक्षनेते विजय चौगुले यांनी मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल केली आहे.

नवी मुंबई पालिकेत ८० मराठी शाळा बंद करण्याचा प्रस्ताव मनमानी व बेकायदेशीर असल्याचा दावा करत त्याच्या अंमलबजावणीवर स्थगिती देण्याची मागणी करण्यात आली आहे. महानगरपालिका हद्दीत सुमारे ८० मराठी शाळांमध्ये अंदाजे ६० हजार विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. नव्या धोरणामुळे मराठी माध्यमावर मर्यादा येण्याची शक्यता व्यक्त होत असून, यावरून राजकीय वातावरण तापले आहे.

मराठी भाषा आणि स्थानिक संस्कृतीचे रक्षण करणे प्रशासनाची जबाबदारी असल्याचे सांगत, मराठी शिक्षण बंद करण्याचा कोणताही प्रयत्न सहन केला जाणार नाही, असा इशारा चौगुले यांनी दिला आहे. गरज पडल्यास रस्त्यावर उतरून आंदोलन करण्याचाही इशारा देण्यात आला आहे.

## महाराणी गायत्री देवी यांच्याकडील 'सुपर कॉम्प्युटर'चा लंडनमध्ये लिलाव

■ लंडन

१७ व्या शतकातील जयपूरच्या महाराणी गायत्री देवी यांच्या खजिन्यातील पितळेपासून तयार केलेल्या खगोलीय उपकरणाचा पुढील आठवड्यात लंडनमध्ये 'सदबी' या लिलाव करणाऱ्या कंपनीच्या वतीने लिलाव करण्यात येणार आहे. प्राचीन काळापासून ते आधुनिक काळाच्या सुरुवातीपर्यंत खगोलीय





वस्तूंची उंची मोजण्यासाठी, कालगणनेसाठी तसेच अक्षांश निश्चित करण्यासाठी वापरण्यात येत असलेल्या या उपकरणाला 'सुपर कॉम्प्युटर' म्हटले जाते.

इस्लामिक जगतातील कलावस्तू आणि भारत या नावाने सदबी येत्या बुधवारी हा लिलाव पुकारणार आहे. या लिलावातील महाराणी गायत्रीदेवी यांच्याकडील हा सुपर कॉम्प्युटर हे मुख्य आकर्षण आहे. लिलावात हा



सुपर कॉम्प्युटर दीड ते अडीच दशलक्ष ब्रिटिश पाउंडमध्ये विकला जाईल, असा सदबीचा अंदाज आहे.

महाराजा सवाई मानसिंग दुसरे यांच्या खजिन्यातील हे उपकरण त्यांच्या पश्चात वारसा हक्काने त्यांच्या पत्नी गायत्री देवी यांच्या ताब्यात आले होते. पुढे हे उपकरण खासगी कंपनीकडे हस्तांतरित करण्यात आले होते.

## चुकीचा अर्थ काढू नका बागेश्वर बाबांचा माफीनामा

■ मुंबई

**बागेश्वर** बाबा म्हणाले की, छत्रपती शिवाजी महाराज यांची संत-महंत, आई तुळजाभवानीवर श्रद्धा होती. तो भाव मी माझ्या भाषेत मांडला. मात्र त्या विधानाचा काही लोकांनी अनर्थ करून त्याचा वेगळा अर्थ काढला. त्यामुळे कोणाच्या भावना दुखावल्या असतील तर मी मनापासून माफी मागतो. परंतु माझी विनंती आहे की, माझ्या विधानाचा चुकीचा अर्थ काढू नये. कारण हिंदू राष्ट्राची कल्पना किंवा विचारधारा आम्ही त्यांच्या प्रेरणेतून घेतली आहे. तर आम्ही त्यांचा अवमान स्वप्नातही करू शकत नाही.

## अशोक खरातला सहाव्या गुन्ह्यात १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी

■ नाशिक



**नाशिकमधील** महिलांचे लैंगिक शोषण, फसवणूक आणि जादूटोणा प्रकरणातील आरोपी भोंदू अशोक खरात याला सहाव्या गुन्ह्यात १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावण्यात आली. पोलीस कोठडी संपल्यानंतर त्याला न्यायालयात व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे हजर करण्यात आले.

खरातविरोधात गुन्ह्यांची मालिका मोठी असल्याने विशेष तपास पथक त्याला सातव्या गुन्ह्याच्या तपासासाठी पुन्हा ताब्यात घेणार आहे. सरकारी वकिलांनी न्यायालयात मांडले की, न्यायालयीन कोठडीत त्याच्या जीविताला धोका असू शकतो. त्यामुळे पुढील तपासासाठी तातडीने ताबा देण्यात यावा. २०१७ मध्ये आई-वडिलांच्या मृत्यूचा योग टाळण्यासाठी अवतारपूजा करायची आहे, असे सांगून

### सातव्या गुन्ह्यातही ताब्यात घेणार

भोंदू अशोक खरातने त्याचाच सीए ललित पोफळेच्या मनात भीती घालत तब्बल ८ कोटी ७६ लाखांची फसवणूक केली. या प्रकरणी सरकारवाडा पोलीस ठाण्यात खरातवर सातवा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. » पान ७ वर

# मटका किंगचे सत्य ...

**नागराज मंजुळे यांचे दिग्दर्शन आणि संयुक्त निर्मिती असलेली 'मटका किंग' सीरिज पाहिली, मनात अनेक गोष्टींचे मोहोळ जागे झाले. त्या अनेक टपऱ्या आठवल्या आणि त्यांच्या नादाला लागून उद्ध्वस्त झालेले संसार आठवले. मटक्याचे रकाने, काही खास दैनिकात येणारे आकड्यांचे अंदाज, फुल स्केप पेपरचे बरोबर बारा तुकडे करून त्यामध्ये कार्बन पेपर ठेवून दिली जाणारी टीप आठवली. सकाळ-संध्याकाळच्या खास नेमक्या वेळी कासावीस होऊन आशाळभुतागत मटका टपरीवर जाऊन ओपन काय आले आहे आणि क्लोज काय आले आहे याचे अदमास घेणारे भुकेच्या डोहात बुडालेले चेहरे आठवले. मटका लागल्यावर ऐश करून पैसे उडवले जायचे आणि मोठी रक्कम हारली की देशी दारूचा गुत्ता जवळ केला जायचा. हारलेला माणूस पुन्हा पुन्हा पैसे लावत राहायचा. कधी तरी एकदा जिंकायचा. मात्र बहुतांश वेळी तो गर्तेत जायचा. असं करत करत घरेच्या घरे मटक्याने गिळंकृत केली. पण जे मटका घेत होते त्यांचे काय झाले?**

बऱ्याचदा मटका घेणारी माणसं तिशीतली चाळीशीतली असायची. रापलेल्या चेहऱ्याने विस्कटलेल्या केसांची ही माणसं मळकट बिन इस्त्रीच्या कपड्यांवर असायची. टपरीत दोन तीन देवी देवतांची चित्रे असत. साल संपून गेलेले कॅलेंडर असे. शाळेची काळी पाटी एका तारेला अडकवली जायची. पाटीच्या खाली कागदाच्या सुरळ्या असत. कोपऱ्यात कुठे तरी दोन तीन वह्या असत ज्यांची पाने भरलेली असत. सतरंजी अंथरूण त्यावर हा सदगृहस्थ बसलेला असे. गुटखा सुरू होण्याच्या आधीच्या काळात मावा नाहीतर तंबाखू, जर्दा यांची गोळी जबड्यात दाबून ठेवलेल्या अवस्थेत तोंडातला तोबरा तसाच धरून ही माणसं येणाऱ्या जाणाऱ्यांचे निरीक्षण करत असत.

मटका बुकी असं यांचं टेक्निकल पोझिशन असलं तरी लोक मात्र त्याला मटक्याचा दलाल म्हणत. सकाळची ओपनची फिगर डिक्लेअर होण्याच्या सुमारास टपऱ्या उघडल्या जात असल्या तरी रात्रीची फायनल फिगर येईपर्यंत टपरी बंद केली जात नव्हती. सुरुवातीला हे केवळ मटक्याचे आकडे घेत असले तरी पुढे जाऊन या लोकांनी जोडधंदे सुरू केले. व्याजबट्टा, जुगाराचे क्लब, टँगो पंचच्या बाटल्यांचा साठा ठेवणे असं करत करत यांच्यातले काही गबरगंड झाले. काहींनी यात अफाट हात मारला.

मटका बुकिंग घेऊन मोठी झालेली धेंडं स्वतःची यंत्रणा राबवू लागले, काहींनी तर स्थानिक लेव्हलवर वैयक्तिक धंदा सुरू केला. पैसा पैशाकडे ओढला जातो असं म्हटलं जातं, त्या उक्तीप्रमाणे ही काही मोजकी माणसं प्रचंड पैसेवाली झाली. पैसा अफाट झाला की, पोलिसांना खूश ठेवणं आलं. पोलिसांनी आपल्यावर रोज चढू नये म्हणून राजकरण्यांशी संधान बांधणे हेही ओघाने आलं! यातून आणखी पुढचं पाऊल टाकत काहींनी थेट राजकारणात सहभाग घेऊन स्थानिक निवडणुका लढवल्या आणि पैशाच्या जोरावर ते निवडूनही आले. समाजात आपली पत वाढावी म्हणून ही मंडळी कोणत्याही जातीधर्माच्या उत्सवाच्या मंडळांचे कार्यकर्ते वर्गणीसाठी यांच्याकडे गेले तर त्यांना नाराज करत नसत.

त्यांनी एकीकडे डोकं वापरुन पैसा वाटताना आपापल्या समाजात मात्र चिक्कार पैसा टाकत आपण समाजातले एक मसिहा आहोत हे लोकांमध्ये समाजामध्ये रुजवले. त्यांच्याशी ओळख असणं ही मोठी बाब मानली जाऊ लागली. प्रत्येक जातीतला असा एक धर्मात्मा मोठा होत गेला. त्या त्या जातीच्या लोकांनी त्याला हृदयात स्थान दिलं. पुढे जाऊन या लोकांनी मग आपली दानत आणखी वाढवत गोरगरिबांना मदतही केली. मात्र ही मदत एकीकडे जारी असताना त्यांचा हा हजारोंचे संसार उद्ध्वस्त करणारा मटक्याचा धंदाही चालूच होता! अशी माणसं प्रत्येक शहरात दिसू लागली. मटक्याने बाळसं धरलं आणि या मोजक्या लोकांना तर जणू अमरत्व लाभलं!

नवीन पोलीस अधिकारी आले की, कारवाईचा फार्स व्हायचा. हप्त्याची सेटिंग पक्की व्हायची, वसुलदार नेमले जायचे आणि पुन्हा धंदा सुरळीत चालायचा. जे राजकारणात यशस्वी झाले नाहीत त्यांनी अपराध जगतातले अन्य मार्ग चोखाळून पाहिले. काहींनी बायकांचे कुंटणखाणे उभे केले, लॉजिंगच्या गोंडस नावाखाली मोक्याच्या जागी चादरबदलीचा धंदा सुरू केला. काहींनी हातभट्टीला बळ दिले तर काहीनी नव्या जमान्याचा व्हिडिओ पार्लरचा धंदा खोलला.

मोजक्या लोकांना हे साधले. बाकी किरकोळ बुकिंग घेणारे कस्पटासमान जिंदगी जगले आणि मेले! त्यांच्याकडे किरकोळ दोन पाच रुपयांची बुकिंग देणारे कंगाल होऊन मेले आणि त्यांच्यापेक्षा थोडेसे बरे आयुष्य जगून हेदेखील खस्ताहाल अवस्थेतच मेले. यांच्या पिढ्या उद्ध्वस्त झाल्या.

मटका चालू राहावा अशी पोलिसांची इच्छा असे. दोन नंबर धंदा सुरू असला की, सगळीकडे चलन फिरते, मार्केटमध्ये कॅश फ्लो टिकून राहतो आणि क्रिमिनल एलिमेंट्स पैसा कमवत शांत राहतात, पोलिसांना हप्ता मिळतो! सर्वांनाच बरकत! फक्त जे पैसे लावतात तेच खपतात, पण त्यांची पर्वा कुणी आणि का करावी? त्यामुळे काहीही झाले तरी मटका आपलं स्वरूप बदलून नव्या नव्या प्रकारे स्थापित होत राहिला. मोबाईलचे प्रस्थ वाढल्यावर अनेक ठिकाणी पोलिसांचा पत्ता कट करण्यासाठी वा त्यांची 'पाती' कमी करण्यासाठी मोबाईलवर बुकिंग घेतले जाऊ लागले. पुढे जाऊन मटक्यावाल्यांनी आयपीएलचे सट्टे सुरू केले.

हा नवा मटका सट्टा तरुण पिढीला उद्ध्वस्त करत असतानाही साऱ्या यंत्रणा शांत मौन बसून आहेत! यात एक विचित्र विरोधाभास आणि गंमतदेखील आहे- जे कथित पांढरपेशे वा मध्यमवर्गीय लोक आहेत त्यांना या संपूर्ण प्रकाराची फक्त उत्सुकता असते. मात्र ते त्याविषयी चीड संताप व्यक्त करताना दिसत नाहीत. कारण त्याची झळ त्यांना क्वचित बसते. आयपीएलचा सट्टा सुरू झाल्यापासून मात्र या परिघाबाहेर कुणीच राहिले नाही, सर्वांचे वर्तुळ एकच झालेय! तरीही कुणाला त्याची फिकीर नाही! आता नागराज मंजुळे यांचा मटका किंग पाहिल्यावर अनेकांना ती रोजगारीची संधी वाटेल इतके ते जग त्यांनी भन्नाट पद्धतीने दाखवले आहे. हॉटेल कामगार, बांधकाम मजूर, रोजंदारीचे कामगार, हातावर पोट असणारी लाखो माणसं, काहीही केलं तरी उत्पन्न वाढत नसल्याने चटकन पैसे मिळावेत म्हणून गुंतून पडलेले कनिष्ठवर्गीय, चोरीचपाटी करून वीस-पंचवीस रुपये मिळवणारे भणंग, पैशाचा हव्यास जडलेली माणसं अशी लाखो माणसं आणि त्यांचा संसार या धंद्याने उद्ध्वस्त करूनही हा धंदा आजही सुरू आहे!




एक शेवटची नोंद करून थांबतो. रेड लाईट एरियात फिरताना एक गोष्ट जाणवली ती अशी की, या धंद्यातील ऐंशी-नव्वदच्या दशकातल्या बहुसंख्य बायका मटक्यावर पैसे लावत. आकडा सांगणारा एक इसम त्यांच्या गुत्त्यात फिरे, हारलेल्या बायका उद्या पैसे जिंकता येतील या आशेने पुन्हा पुन्हा पैसे लावत. त्यांनी जिंकलेले पैसे देखील त्यांना क्वचित दिले जायचे, ही गोष्ट त्रासदायक होती. मटकेवाल्यापाशी उधारी चालत नव्हती. ते या बायकांशी थेट संबंध कधीच ठेवत नसत. नोटबंदीच्या काळात या बायकांचे पैसे ज्यांनी ज्यांनी लुबाडले त्यात मटकेवाले अग्रस्थानी होते!

**- समीर गायकवाड**

केवळ या बायकाच पैसे लावत होत्या असे म्हणणे धाडसाचे ठरेल. हॉटेलात भांडी धुणाऱ्या बायकांनाही याचे व्यसन जडलेले असे. झाडलोट करणाऱ्या आणि मोस्टली श्रमाचे काम करणाऱ्या बायकाही यात अडकून पडल्या होत्या. त्यांच्यात आणि रोज उठून आशाळभुतासारखं आकड्याचं जग डोक्यात घेऊन फिरणाऱ्या पुरुषांत एक महत्त्वाचा फरक होता. तो फरक म्हणजे या बायकांना जिंकलेले पैसे कुटुंबाच्या जबाबदाऱ्या निभावण्यासाठी हवेहवेसे वाटत! मटक्यात पैसे जिंकलेली बाई दारूमटणाची पार्टी करताना मी माझ्या आयुष्यात कुठेही कधीही पाहिली नाही!

मटका किंग रतन खत्रीच्या रूपाने देशभरात एकच होता. मात्र त्याचे स्थानिक उमराव जमीनदारासारखे मनसबदार मात्र प्रत्येक शहरात निर्माण झाले. त्यांनी व्यवस्थेशी असा काही संग केला की, पोटं फुगलेल्या ढेरपोट्यांचे खिसे मजबूत भरले, राजकारण्यांचे बँक बॅलन्स वाढवले, खाकी वर्दीला पैशाने गर्वार केले आणि स्वतः मात्र धर्मात्मा म्हणून मिरवून घेतलं! आकडे सांगणाऱ्या बाबा बुवांचे पेव फुटले. भाग्यलक्ष्मी लाभलक्ष्मी सारख्या लॉटऱ्यांनी हात धुवून घेतले!

फिरोजखान आणि प्रेमनाथच्या प्रमुख भूमिका असलेला 'धर्मात्मा' हा देखील मटकाकिंग रतन खत्रीच्या आयुष्यावर बेतलेला होता. यात प्रेमनाथचे नाव धर्मदास असतं. हाच धागा 'कर्ज'मध्ये होता, त्यात त्याला जे काही महत्त्वाचे सांगायचे असते, ते तो काचेच्या ग्लासवर टिचकी मारून सांगायचा. त्याने किती टिचक्या मारल्या आणि त्याचा ध्वनीनाद कसा होता यावरून अर्थ लावण्यात यायचा.

खऱ्या आयुष्यातला रतन खत्री मटक्यावर टिचक्या मारायचा, त्याने किती टिचक्या मारल्या याची नोंद पत्ते काढणारा घेत असे. अपराध जगताची एंट्री करून देणाऱ्या या धंद्यातले कोडवर्डस आजही विसरू शकलो नाही. नागराज मंजुळेंचा मटका किंग पाहताना ते हजारो भकास चेहरे आणि हताशा हतबलतेने ग्रासलेले खचलेली पिचलेली माणसं आठवली! पोटात कालवलं! पायाखाली मुंग्या चिरडून टाकाव्यात इतक्या सहजतेने समाजाने, सरकारने आणि व्यवस्थेने ही माणसं अशी किड्यामुंगीच्या मौतीने कशी काय मरू दिली याचे शल्य आजही वाटते! माझे बालपण आणि आयुष्यातील बरीच वर्षे ज्या परिसरात गेली त्या भागांतली अनेक माणसं, अनेक घरं आणि तिथल्या विमनस्क चेहऱ्याच्या बायका आठवल्या! याची दोषनिश्चिती कशी करायची हा यक्षप्रश्न आजही छळतो! मटक्याची दुनिया बेरंगी होती, पण इंद्रधनुष्यी स्वप्ने दाखवण्याची त्यात ताकद होती, याच स्वप्नांना गोरगरीब भुलत गेले हे वास्तव टोकदार होतं!

## पत्रकार निरंजन टकले यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुरस्कार प्रदान

■ मुंबई

**निर्भीड** पत्रकार व विचारवंत यांना यावर्षीचा डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुरस्कार भारतीय बौद्धमहासभा व समता सैनिक दलाचे अध्यक्ष डॉ. भीमराव यशवंत आंबेडकर यांच्या हस्ते काल दादर येथील शिवाजी महाराज नाट्य मंदिर येथे देण्यात आला.



विकास प्रतिष्ठान - महाराष्ट्र राज्य या प्रसिद्ध संस्थेच्या वतीने विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त दरवर्षी हा पुरस्कार विविध क्षेत्रातील मान्यवर व्यक्तींना प्रदान करण्यात येतो, यावेळी अभिनेते व निर्भीड वक्ते किरण माने व समाजसेविका सुनिताताई भोसले यांनासुद्धा पुरस्काराने गौरविण्यात आले. भारतातील भटके विमुक्त आदिवासी दलित बहुजन आणि स्त्रिया यांच्यावरील अन्यायावर वाचा फोडण्याचे काम या पुरस्कार प्राप्त झालेल्या मान्यवरांनी केले. त्यांनी आपल्या भाषणातून स्पष्ट सांगितले की, जोपर्यंत हा संपूर्ण वंचित समाज डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना वाचत नाही व त्यांच्या विचारावर चालत नाही तोपर्यंत प्रगती अशक्य आहे.

या संपूर्ण कार्यक्रमाचे नियोजनबद्ध आयोजन विकास प्रतिष्ठान - महाराष्ट्र राज्य या संस्थेचे अध्यक्ष विकास डोळस यांनी यशस्वीपणे पार पाडले. यावेळी बुद्ध भीम गीतांचा शिल्पकार जीवनाचाकार्यक्रम विनामूल्य आयोजित करण्यात आला होता.

## नेकनूरमध्ये रात्री दगडफेक सकाळी बाजारपेठ बंद

■ बीड

**बीड** जिल्ह्यातील नेकनूर येथे रिक्षाने कट मारल्याच्या कारणावरून सुरू झालेला वाद रात्री उफाळून आला आणि दोन गटांतील तुंबळ हाणामारी व दगडफेकीत परिवर्तित झाला. ही घटना नेकनूर पोलीस ठाण्यासमोरच घडल्याने परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. या घटनेच्या निषेधार्थ आज आठवडी बाजारपेठ बंद ठेवण्यात आली.

दिवसा रिक्षाने कट मारल्याच्या कारणावरून दुचाकीस्वार आणि रिक्षातील व्यक्तींमध्ये वाद झाला होता. कट का मारला? असा जाब विचारताच रिक्षातील दोघांनी संबंधित व्यक्तीस मारहाण केली. यानंतर वाद मिटवण्यासाठी आणि तक्रार देण्यासाठी एक गट पोलीस ठाण्यात गेला असताना दुसऱ्या गटाने तेथेच गोंधळ घालत वातावरण तापवले. रात्री या वादाचे दगडफेकीत रूपांतर झाले. पोलीस ठाण्यासमोरच दगडफेक झाल्यानंतर पोलिसांनी तत्काळ हस्तक्षेप करत काही आरोपींना ताब्यात घेतले. परिसरात अतिरिक्त पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला असून, परिस्थिती नियंत्रणात ठेवण्यासाठी काही भागातील वीजपुरवठा तात्पुरता खंडित करण्यात आला. दंगल नियंत्रण पथकासह पोलीस फौजफाटा तैनात करण्यात आला.

## मुंबईतील रखडलेल्या भूखंडांचा विकासाचा मार्ग अखेर मोकळा

■ मुंबई

**राज्य** सरकारच्या विकास नियंत्रण आणि प्रोत्साहन नियमावलीमध्ये ९ मीटरपेक्षा कमी रुंदीच्या पोहोच रस्त्याला जोडलेल्या भूखंडांचाही समावेश करण्यात आला आहे. त्यामुळे अशा भूखंडावरील पुनर्विकास आणि बांधकामाला मंजुरी मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. या भूखंडांना आता 'फायर एनओसी' मिळणार असल्याने बांधकामासाठीची अडचण दूर झाली आहे.

गेल्या काही वर्षांत मुंबईचा विकास झपाट्याने होत आहे. मात्र ९ मीटरपेक्षा कमी रुंदीच्या पोहोच रस्त्याला जोडणाऱ्या भूखंडांचा विकास रखडलेलाच आहे. भूखंडांची जागा मोठी, पण भूखंडाचा रस्ता अरुंद ९ मीटरपेक्षा कमी रुंदीच्या रस्त्याला जोडला गेला असेल, अशा भूखंडाचा विकास रखडला आहे. अशी भौगोलिक परिस्थिती असल्याने अशा भूखंडांच्या विकासकामांसाठी 'फायर एनओसी' दिली जात नाही. मात्र आता अशा भूखंडांचा विकास

### 'डीसीपीआर' मध्ये छोट्या जागेतील भूखंडांचा समावेश

करण्यासाठी त्यांचा 'डीसीपीआर'मध्ये समावेश करण्यात येणार आहे. त्यामुळे 'फायर एनओसी' मिळणे सोपे होणार आहे. दरम्यान, मुंबई महापालिकेने याबाबत प्रस्ताव तयार केला असून, सुधार समितीच्या मंजुरीनंतर सभागृहात तो मंजुरीसाठी सादर करण्यात येईल. सभागृहाची मंजुरी मिळाल्यानंतर राज्य सरकारच्या नगरविकास विभागाकडे अंतिम मंजुरीसाठी हा प्रस्ताव सादर करण्यात येणार आहे. नगरविकास विभागाची मंजुरी मिळाल्यानंतर अशा भूखंडांचा विकास होण्याचा मार्ग मोकळा होणार आहे.

## ठाण्यात 'मामलेदार मिसळ'ची ऐतिहासिक वास्तू जमीनदोस्त

■ ठाणे

**तिखट** आणि झणझणीत खाणाऱ्या खवय्यांना वेड लावणाऱ्या ठाण्यातील मामलेदार मिसळची वास्तु आता इतिहासजमा झाली आहे. तहसील कार्यालयाच्या पुनर्विकासामुळे हे प्रसिद्ध ठिकाण पाडण्यात आले आहे.

अनेक राजकीय नेत्यांपासून अभिनेत्यांपर्यंत प्रसिद्ध असलेली 'मामलेदार मिसळ' १९५० दशकात ठाणे तहसील कार्यालयाच्या आवारात एका छोट्याशा जागेत सुरू झाली होती. मात्र गेल्या वर्षभरापासून तिथल्या तहसील कार्यालयाच्या पुनर्बांधणीसाठी त्यालगत असलेल्या मामलेदार मिसळीच्या वास्तूला पाडण्यात आले आहे. ठाणे शहराच्या खाद्यसंस्कृतीचा अविभाज्य भाग आणि ऐतिहासिक वारसा लाभलेली 'मामलेदार मिसळ' ज्या जुन्या वास्तूतून साऱ्यांच्या जिभेवर राज्य करत होती, त्या वास्तूला तत्काळ सोडून दुसऱ्या ठिकाणी सुरू झाली आहे. पुनर्विकासानंतर नव्या जागेत पुन्हा सुरू होणार आहे.

## नागपूरमध्ये जुन्या वादातून तरुणाची निर्घृण हत्या

■ नागपूर

**नागपूर** शहरात जुन्या वादातून रोशन उईके या तरुणाची निर्घृण हत्या झाल्याची धक्कादायक घटना घडली. याप्रकरणी मुख्य आरोपी जावेद उर्फ लाला याला पोलिसांनी अटक केली असून, त्याचे अन्य तीन साथीदार अद्याप फरार आहेत.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, रोशन आणि जावेद यांच्यात गेल्या काही काळापासून जुना वाद सुरू होता. दोन दिवसांपूर्वीही दोघांमध्ये किरकोळ कारणावरून पुन्हा वाद झाला होता.

## तेलंगणात चारमिनार एक्स्प्रेसच्या डब्याला आग! प्रवासी बचावले

■ तेलंगणा

**यादद्री** भुवनगिरी जिल्ह्यातील आलेर रेल्वे स्थानकाजवळ आज चारमिनार एक्स्प्रेसच्या एका डब्याला अचानक आग लागल्याने प्रवाशांमध्ये घबराट पसरली. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही.

चारमिनार एक्स्प्रेस ही गाडी स्टेशनजवळ येत असताना एस-५ डब्याला आग लागली. रेल्वे कर्मचाऱ्यांनी मोटरमनशी संपर्क साधून गाडी थांबवली आणि आग विझवण्यासाठी प्रयत्न सुरू केले. आग लागल्याचे समजताच प्रवाशांमध्ये एकच गोंधळ उडाला. काही प्रवाशांनी खिडक्यांमधून आणि दरवाजातून खाली उड्या मारून जीव वाचवला. अग्निशमन दल आणि रेल्वे कर्मचाऱ्यांनी काही तासांत आग विझवली.

## पुलावरून मुलगी पडली! मच्छिमाराने प्राण वाचवले

■ नायगाव

**नायगाव** उड्डाणपूलावरून पाण्यात पडलेल्या १५ वर्षांच्या मुलीला मच्छिमारांनी वाचवले. रात्री साडेअकरा वाजताच्या सुमारास ही घटना घडली.

रात्री ही १५ वर्षांची एक मुलगी आपल्या मित्रांसोबत नायगाव उड्डाणपुलाच्या कठड्यावर बसून गप्पा मारत होती. अचानक तिचा तोल गेला आणि ती थेट ७० फूट खाली पाण्यात पडली. यावेळी जवळच मासेमारी करत असलेल्या हेरेकिशन मिटना यांनी तत्काळ पाण्यात उडी मारली आणि मुलीला सुरक्षित बाहेर काढले. स्थानिकांच्या मदतीने तिला तातडीने पालिकेच्या डीएम पेटीट रुग्णालयात दाखल करण्यात आले.

## सेंच्युरी मिलच्या जागेतील पुनर्विकासाचा मार्ग मोकळा

■ मुंबई

**वरळीतील** प्रतिष्ठित सेंच्युरी मिलच्या सुमारे ६ एकर जागेच्या पुनर्विकासाचा मार्ग आता मोकळा झाला आहे. या मोक्याच्या जागेवर उंच निवासी इमारती उभारण्याचे नियोजन आहे. या प्रकल्पात रस दाखवत ४ मोठ्या नामवंत कंपन्यांनी पुढाकार घेतला आहे. या ठिकाणी गिरणी कामगार आणि कर्मचाऱ्यांसाठी हक्काची घरे आणि आलिशान सदनिका विकसित केल्या जाणार आहेत. या पुनर्विकास प्रकल्पामुळे पालिकेच्या तिजोरीत १३४८ कोटी रुपयांचा महसूल जमा होणार आहे.

### चार बड्या कंपन्यांचा प्रकल्पासाठी पुढाकार


सेंच्युरी मिलच्या जागेतील प्रकल्पासाठी शापूरजी पालनची ग्रूप, रहेजा ग्रुपसह एकूण चार बड्या कंपन्यांनी पुढाकार घेतला आहे. या जागेचा विकास झाल्यानंतर पालिकेच्या तिजोरीत १ हजार ३४८ कोटींचा महसूल जमा होणार आहे. वरळी येथील सहा एकर भूभाग गरीब वर्गातील कर्मचाऱ्यांसाठी सेंच्युरी स्पिनिंग आणि मॅन्युफॅक्चरिंग लिमिटेड यांना १ एप्रिल १९२७ पासून पुढील २८ वर्षांच्या कालावधीसाठी देण्यात आला होता. या जागेवर मिलकडून बांधण्यात आलेल्या ४७६ खोल्या,१० दुकाने व चाळींसह हा ठेका ३ ऑक्टोबर १९२८ ला केलेल्या करारान्वये देण्यात आला होता. हा करार ३१ मार्च १९५५ ला संपुष्टात आला. करार संपुष्टात आल्यानंतर या भूभागावर मुंबई महापालिकेची मालकी आहे. करार संपुष्टात आल्यानंतर भूभाग परत करण्याऐवजी तो आपल्या नावे अभिहस्तांतरित करण्यासाठी सेंच्युरी मिल यांनी उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती तर महापालिकेनेही खटला लढवला. न्यायालयीन लढा जिंकल्यानंतर सेंच्युरी मिलची जागा मुंबई पालिकेच्या ताब्यात आली.












संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवाकाळ

।। न मे भक्त प्रणश्यति ।।

# संविधानातूनच लोकशाही टिकेल

**आपल्या** देशात आचार-विचार स्वातंत्र्य प्रचंड प्रमाणात दिले गेले आहे. परंतु या स्वातंत्र्याचा संविधानाच्या चौकटीत राहून आणि समाजव्यवस्थेच्या मूल्यांचा विचार करूनच वापर झाला पाहिजे. दुर्दैवाने तसे होताना दिसत नाही. बोलण्याचे किंवा विचार व्यक्त करण्याचे स्वातंत्र्य असल्याने अनेकवेळेला विचारपूर्वक विधाने केली जात नाहीत. तर काहीवेळेला भाषणांचाही विपर्यास केला जातो. परंतु विपर्यास होण्याची शक्यता लक्षात घेऊनच मत व्यक्त केले जाणे अधिक योग्य ठरते. भारताचे संविधान तयार करताना या सगळ्याच बाबींचा विचार केला गेला. कारण अत्यंत परिश्रमाने मिळालेले हे स्वातंत्र्य संविधानाच्या माध्यमातून टिकून राहिले पाहिजे. आणि लोकशाही मूल्यांचे संवर्धन झाले पाहिजे असा हेतू ठेवला गेला होता. परंतु अलिकडच्या काळात 'उचलली जीभ लावली टाळ्याला' अशा पद्धतीने विधाने होत असतात. गेल्या आठवड्यातली काही उदाहरणे लक्षात घेतली तर त्याचा अंदाज येतो. मग अगदी काँग्रेसच्या पवन खेरांनी आसामच्या मुख्यमंत्र्यांबाबत केलेले भडक विधान असेल किंवा बागेश्वरधामच्या बाबांनी केलेले शिवाजी महाराजांबाबतचे वक्तव्य असेल. काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी पंतप्रधानांना दहशतवादी म्हणण्याचा प्रकार असेल किंवा रा.स्व. संघाचे सरसंघचालकांनी चार अपत्य जन्माला घाला आणि एक अपत्य संघाला द्या असे केलेले आवाहन असेल. एवढेच नव्हे तर भाजपाचे एक माजी खासदार विनय सहस्त्रबुद्धे यांनी नाशिकमध्ये आध्यात्मिक लोकशाहीची देशाला गरज असल्याचे केलेले विधान असेल किंवा शिवसेनेचे आमदार संजय गायकवाड यांनी एका प्रकाशकाबाबत वापरलेली आर्वाच्य भाषा असेल हे सगळे प्रकार आचार, विचार स्वातंत्र्याची ऐंशी तैशी करणारे ठरतात. जी संसदीय लोकशाही व्यवस्था आपण स्वीकारलेली आहे त्याच्या चौकटीत राहूनच विचाराचे स्वातंत्र्य जपले गेले पाहिजे. आपण मांडलेल्या विचाराचा किंवा मताचा सामाजिकदृष्ट्या काय परिणाम होईल हे लक्षात घेतले जाणेसुद्धा खूप महत्त्वाचे ठरते. परंतु आजच्या सोशल मीडियाच्या जगात तर त्यासंदर्भातले कोणतेही भान ठेवले जात नाही.

### आध्यात्मिक लोकशाहीचे नवे खुळ

भारतासारख्या अनेक प्रकारची विविधता असलेल्या देशात अतिशय जाणीवपूर्वक संसदीय लोकशाहीची कार्यपद्धती स्वीकारली गेली. आणि त्याला जी जगातल्या अन्य देशांपेक्षा अधिक विस्तृत आणि व्यापकही ठरली. परंतु ज्यावेळी आध्यात्मिक लोकशाही असावी असे मत मांडले जाते त्यावेळेला संसदीय लोकशाहीचे काय करायचे हा मुद्दादेखील अतिशय ओघाने येतो. पंतप्रधान मोदींनी भारताचे संविधान हाच लोकशाहीचा प्राण असल्याचे वारंवार सांगितलेले आहे. अशावेळी भाजपाचेच लोक लोकशाहीसंदर्भात असे उलट सुलट विचार व्यक्त करतात. त्यावेळेला त्यांना नेमके काय अभिप्रेत आहे, याचा त्यांनाही पत्ता लागत नाही. काही वर्षांपूर्वी संघाच्याच अशा स्वयंघोषित विचारवंताने गांधीवादी समाजवाद असा एक नवीन प्रकार शोधून काढला होता. सर्व समाजाचा विचार करणारा गांधीवाद हा स्वतंत्र आहे. आणि सामाजिक स्तरावरची सर्व प्रकारची समानता व्यक्त करणारा समाजवाद वेगळा आहे. परंतु विचारांचाच संभ्रम आणि गोंधळ असला की, मग सुचलेल्या शब्दांमधून आपण फार मोठी वैचारिक मांडणी करीत आहोत. असाही एक संभ्रम संबंधितांमध्ये निर्माण होतो. गेली शंभर वर्षे संघाने सांस्कृतिक राष्ट्रवाद याच्या पलिकडे विचार केलेला नाही. किंबहुना त्याची आवश्यकताही नाही. देशाची राज्य व्यवस्था संसदीय लोकशाही मार्गाने चालली पाहिजे. त्यासाठी संघाने संविधान महत्त्वाचे मानले. आतासुद्धा संघ शताब्दीच्यानिमित्ताने पंचपरिवर्तन सांगितले गेले आहे. त्यामध्ये सामाजिक समरसता आणि संविधानालाच अभिप्रेत असलेले नागरी कर्तव्य सांगितली गेली. कुटुंब प्रबोधनाचाही मुद्दा त्यात आलेला आहे. स्वदेशी, पर्यावरण या मुद्यांना समाविष्ट करून संघ स्वयंसेवक हे पंचपरिवर्तन राबवण्यासाठी प्रयत्न करीत आहेत. यातला बारीकसा विरोधाभासही असा आहे की, सध्याच्या छोट्या कुटुंबांसाठीच संघाला कुटुंब प्रबोधन करावे लागते आहे. अशावेळी पुन्हा चार अपत्य असलेल्या कुटुंबांची आवश्यकता सांगताना अधिक मोठ्या प्रबोधनाची गरज भासू शकते. या सगळ्या मुद्यांचा परामर्श एवढ्यासाठी आहे की, संसदीय लोकशाही प्रणालीमध्ये आध्यात्मिक लोकशाहीसारखा प्रकार जसा अनावश्यक ठरतो, तसाच चार अपत्यांविषयीचा विचारही सद्य स्थितीत गैरलागू वाटू लागतो.

### भाषणस्वातंत्र्याचा अतिरेक

आपल्या देशात तर भाषण स्वातंत्र्याला इतक्या सहजपणे उपयोगात आणले जाते की, काहीही बोलण्याचा तो मुक्त परवाना आहे अशीच अनेकांची समजूत आहे. त्यात राजकारण्यांच्या जीभेला तर हाडही उरत नाही. धमक्या देण्यापासून ते थेट पंतप्रधानांना दहशतवादी म्हणण्यापर्यंत कोणी कशीही वक्तव्य करत असतो. या सगळ्या शक्यता लक्षात घेऊनच भारताच्या संविधानात खूप मूलभूत विचार केलेला आहे. लोकशाही तत्त्वांचा कोणालाही अनाठायी गैरफायदा घेता येणार नाही. याची पुरेशी काळजी घेतली गेलेली आहे. संविधानातल्या या सगळ्या तरतुदी सामान्य माणसापर्यंत अधिक सोप्या आणि सुटसुटीत भाषेत पोहोचवण्याची आवश्यकता आहे. आणि तेच संविधान सगळ्याच तथाकथित सुशिक्षित लोकांनीदेखील अभ्यासण्याचीही गरज वाटू लागते. जगातील सर्वात मोठा लोकशाहीवादी देश आणि जगातल्या लोकशाहीची जननी म्हणून जर भारताचा उल्लेख होणार असेल तर ती लोकशाही आपल्या बोलण्यातून व्यवहारातून समृद्ध कशी होईल हे बघितले गेले पाहिजे. हक्क, अधिकार हे जसे संविधानाने दिलेले आहे. त्याच पद्धतीने जबाबदाऱ्या आणि कर्तव्यांचे देखील भान करून दिलेले आहे. परंतु कर्तव्य आणि जबाबदाऱ्यांच्याबाबतीत फारसा विचार केला जात नाही. हक्क आणि अधिकार यांच्याबाबतीत लोकशाहीचा आधार घेतला जातो. लोकशाहीचा हा एकतर्फी विचार दुर्दैवीच म्हणावा लागतो. याचे महत्त्वाचे कारण म्हणजे भविष्यकाळात लोकशाही टिकली तरच स्वातंत्र्य टिकणार आहे, हे लक्षात ठेवावे लागेल.

## सुविचार

**विलास कोळेकर**
खंडाळा, रत्नागिरी. मोबा.९४२२४२०६११

ज्या कामात आव्हान नाही
ते काम तुमच्यात बदल घडवू शकत नाही.

## पंचांग



**सोमवार, २७ एप्रिल २०२६**
**शक १९४८ पराभवनामसंवत्सर**

* वैशाख शुक्ल एकादशी
* नक्षत्र - पूर्वा फाल्गुनी

रवी उदय- ०६-१५
रवी अस्त- १८-५८

-: जन्मराशी :-
००-०१ ते २४-०० सिंह

**मोहिनी एकादशी; सूर्य भरणी उत्तररात्री १.१७, सखाराम महाराज रथोत्सव - अंमळनेर**

मुद्रक, प्रकाशक **सौ. जयश्री रमाकांत खाडिलकर-पांडे** यांनी हे दैनिक नवाकाळ ऑफीस आणि नवाकाळ प्रेस करिता दांगट मीडिया प्रा.लि., पत्ता: प्लॉट नं. २२, दिघा एमआयडीसी, टीटीसी इंडस्ट्रीयल एरीया, विष्णू नगर, दिघा, नवी मुंबई -४००७०८ येथे छापून घेतले व नवाकाळ बिल्डिंग, १३ नवाकाळ पथ, खाडीलकर रोड, गिरगांव, मुंबई -४००००४ येथे प्रसिद्ध केले.
संपादक : **रोहित रमाकांत पांडे** • कार्यकारी संपादक: **समीर करंबे** (*पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी कार्यकारी संपादक यांच्यावर आहे.)

संपर्क : संपादक विभाग: ८६५२२०१४४०,
जाहिरात विभाग : ८१०८११६४२३, ८१०८११६४२९,
छोट्या जाहिराती: ८४२२८१७४४५. वितरण विभाग : ९५९४९३६४४१
ई-मेल: contact@navakal.in
'नवाकाळ ऑफिस व नवाकाळ प्रेस'चे प्रकाशन दैनिक
'नवाकाळ' आर.एन.आय.क्र.१८१४/५७
स्थापना ७ मार्च १९२३/ फाल्गुन वद्य ५ शके १८४४

Printed and Published by **Jayshree Ramakant Khadilkar-Pande** On behalf of Navakal Office And Navakal Press. Printed at Dangat Media Pvt. Ltd., Address : Plot No.22, Digha M.I.D.C., TTC Industrial Area, Vishnu Nagar, Digha, Navi Mumbai - 400 708. Published at Navakal Building, 13 Navakal Path, Khadilkar Road, Girgaum, Mumbai - 400 004.
Editor - **Rohit Ramakant Pande** • Executive Editor - **Sameer Karambe** (*As per P.R.B. law Executive Editor will be responsible for all the content in Daily Navakal)

## पाककृती



### गोकर्णा मॉकटेल



सध्या कडक उन्हाळा सुरू आहे. अंगातून घामाच्या धारा सुरू असतात. अशावेळी आपल्याला काही तरी थंडगार प्यावेसे वाटते. शक्यतो आपण थंड सरबत, लिंबू सरबत, पन्हे किंवा कोकम सरबत पितोच. परंतु आज आपण येथे एक हटके रॉयल सरबत बनवून पाहूया.. तर ते आहे 'गोकर्णा मॉकटेल'. गोकर्णा एक फुलाचा प्रकार आहे. त्याचा रंग निळा असतो. आयुर्वेदातही त्यांना विशेष महत्त्व आहे. या फुलांपासून बनवलेला निळा चहा तर प्रसिद्ध आहेच, पण याच फुलांचा वापर करून आपण 'गोकर्णा मॉकटेल' बनवू शकता.

★ **साहित्य:-** गोकर्णाची ताजी फुले - ८ ते ९, पाणी - १ कप, लिंबाचा रस - २ चमचे, साखर किंवा मध - चवीनुसार, पुदिन्याची पाने- ५ ते ६, बर्फाचे खडे - ५ ते ६, सोडा - गरजेनुसार

★ **कृती :-** सगळ्यात आधी गोकर्णाच्या फुलांचे देठ काढून घ्या. नंतर ते स्वच्छ पाण्याने धुवा. एका काचेच्या ग्लासमध्ये गोकर्णाची फुले, पुदिन्याची पाने, लिंबाच्या गोल फोडी आणि मध घाला. आता यानंतर या सर्व पदार्थांना थोडे क्रश करा. ज्यामुळे त्यातील रस बाहेर निघेल. वरून बर्फाचे तुकडे, सोडा आणि थोडेसे पाणी घाला. स्ट्रॉने व्यवस्थित मिक्स करून प्या. रेस्टॉरंट स्टाईल 'गोकर्णा मॉकटेल' तयार आहे.

# सुपर ओव्हरमध्ये कोलकाताचा विजय

## नरेनच्या फिरकीपुढे लखनौचे लोटांगण

**लखनौमध्ये कोलकाता नाईट रायडर्स आणि लखनौ सुपर जायंट्स संघातील आयपीएलचा ३८ वा सामना सुपर ओव्हरमध्ये पोहोचला होता. रिंकू सिंगच्या नाबाद ८३ धावांच्या बळावर कोलकाताने लखनौसमोर १५५ धावांचे आव्हान दिले होते. मात्र या धावसंख्येचा पाठलाग करणाऱ्या लखनौला विजयासाठी शेवटच्या एक चेंडूत ७ धावांची गरज असताना मोहम्मद शमीने खणखणीत षटकार ठोकून हा सामना बरोबरीत सोडवला. त्यामुळे झालेल्या सुपर ओव्हरच्या ३ चेंडूंत सुनिल नरेनने लखनौला २ बळी घेऊन १ धावेवर रोखले. हे लक्ष्य कोलकाताच्या रिंकूने पहिल्या चेंडूवर चौकार ठोकून पूर्ण केल्यामुळे हा सामना जिंकला.**

■ लखनौ

**प्रथम** फलंदाजी करताना कोलकाताची अतिशय खराब सुरुवात झाली. टिम सेफर्ट (०), अजिंक्य रहाणे (१०), अंगक्रिश रघुवंशी (९) आणि रोव्हमन पॉवेल (१) हे झटपट स्वस्तात बाद झाले. त्यामुळे कोलकाताची अवस्था ६.१ षटकांत ४ बाद ३१ धावा अशी झाली. मग कॅमेरॉन ग्रीन आणि रिंकू सिंग यांनी संघाचा डाव सावरला. त्यानंतर ही जोडी मोहसिन खानने फोडली. ग्रीन २१ चेंडूंत ३४ धावा करून झेलबाद झाला. अनुकूल रॉय (०)आणि रमणदीप सिंग (६) एकामागून एक रिंकूची साथ सोडून तंबूत परतले. रिंकूने (नाबाद ८३) सुनील नरेन साथीत दिग्वेश राठीच्या २० व्या षटकात ४ षटकार ठोकले. त्यामुळे कोलकाताला ७ बाद १५५ धावांपर्यंत पोहोचता आले.



या धावसंख्येचा पाठलाग करणाऱ्या लखनौचा पहिला बळी सलामीवीर मिचेल मार्शच्या रुपात वैभव अरोराने घेतला. त्याने फक्त २ धावा केल्या. मग ऋषभ पंत आणि एडन मार्कराम या जोडीने विकेट न गमावता संघाची धावसंख्या १० षटकांत १ बाद ६३ वर पोहोचवली. मात्र त्यानंतर ग्रीनच्या गोलंदाजीवर रिंकूने मार्करामचा सीमारेषेवर अफलातून झेल घेतला. तो ३१ धावांवर माघारी परतला. पंत ३८ चेंडूंत ४२ धावांवर बाद झाल्याने सामना रंगात आला. निकोलस पूरन आणि आयुष बडोनी यांच्यासमोर विजयासाठी ४४ चेंडूंमध्ये ७७ धावांची गरज होती. मात्र वरुण चक्रवर्तीने पूरनला (९) स्वस्तात झेलबाद केले. त्यापाठोपाठ मुकुल चौधरी (१) षटकार मारण्याच्या नादात झेलबाद झाला. बडोनी आणि हिम्मत सिंग यांनी आक्रमक फलंदाजी करून सामना १८ चेंडूंत ३८ धावांवर आणला. मात्र वरुण चक्रवर्तीच्या गोलंदाजीवर बडोनीने चुकीचा फटका मारून विकेट फेकली. जॉर्ज लिंडे आणि हिम्मतसमोर विजयासाठी १२ चेंडूंत २८ धावांची आवश्यकता होती. वैभव अरोराने १९ व्या षटकांत जॉर्ज लिंडेची विकेट घेऊन फक्त ११ धावा दिल्या. कार्तिक त्यागीच्या २०व्या षटकांत दोन नो बॉलनंतर हिम्मत झेलबाद झाला. एका चेंडूत ७ धावांची गरज असताना मोहम्मद शमीने षटकार मारल्याने हा सामना सुपर ओव्हरमध्ये गेला.

## शांभवी क्षीरसागरला दुसरे सुवर्णपदक


**सुहेल** - जर्मनीतील सुहेल येथे सुरू असलेल्या आयएसएसएफ कनिष्ठांच्या विश्वचषक नेमबाजी स्पर्धेत भारताची महिला नेमबाज १६ वर्षीय शांभवी क्षीरसागरने महिलांच्या १० मी. एअररायफल नेमबाजीत दुसरे सुवर्णपदक मिळवून दिले. या क्रीडा प्रकारात सुवर्णपदकासाठी शांभवी क्षीरसागर आणि ओजस्वी ठाकुर यांच्यात चुरस झाली. या स्पर्धेत आता भारताने पदक तक्त्यात २ सुवर्णपदक, ३ रौप्यपदक आणि ३ कांस्यपदकांसह एकूण ८ पदके मिळवत आघाडीचे स्थान पटकाविले. महिलांच्या १० मी. एअररायफल नेमबाजीत शांभवीने २५३.० गुणांसह सुवर्णपदक आणि ओजस्वीने २५१.८ गुणांसह रौप्यपदक मिळविले.

## कोराडीत ३० एप्रिलपासून कबड्डी स्पर्धा

■ नागपूर

**कोराडी** येथील सेवानंद विद्यालयात राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेच्या नियोजनासाठी शिवशाही कबड्डी संघाचे जिल्हाध्यक्ष संकेत बावनकुडे यांच्या अध्यक्षतेखाली आढावा बैठक उत्साहात पार पडली.

या बैठकीस क्रीडा उपसंचालक पल्लवी धात्रक, महानगरपालिका नागपूरचे क्रीडा अधिकारी पियुष आंबुलकर, आदर्श पटले, चेतन खडसे तसेच आशिष फुटाने यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी युवा मोर्चाचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवली. ३० एप्रिल ते ५ मे दरम्यान होणाऱ्या या स्पर्धेत राज्यभरातील कबड्डी संघ सहभागी होणार असून, खेळाडूंमध्ये चुरशीचे सामने पाहायला मिळणार आहेत. कबड्डीप्रेमींसाठी ही एक मोठी पर्वणी ठरणार आहे.



## साईच्या ८७ धावांमुळे गुजरातचा चेन्नईवर विजय

■ चेन्नई

**चेन्नईच्या** एम. ए. चिदंबरम स्टेडियममध्ये आज झालेल्या आयपीएलच्या ३७ व्या सामन्यात गुजरात टायटन्सने चेन्नई सुपर किंग्सचा ८ गडी आणि २० चेंडू शिल्लक राखून पराभव केला. या चौथ्या विजयासह गुजरात आयपीएलच्या गुणतालिकेत ८ गुणांसह पाचव्या स्थानावर पोहोचला. या सामन्यात गुजरातने चेन्नईला ७ बाद १५८ धावांवर रोखले. त्यानंतर सलामीवीर साई सुदर्शनने केलेल्या ८७ धावांच्या जोरावर गुजरातने १६.४ षटकांत २ बाद १६२ धावा केल्या. परिणामी चेन्नईला पाचव्यादा पराभूत व्हावे लागले.

या सामन्यात गुजरातने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. चेन्नईची सुरुवात फारशी चांगली झाली नाही. केवळ ३७ धावा धावफलकावर असतानाच चेन्नईचे ४ गडी बाद झाले. दबावात कर्णधार ऋतुराज गायकवाडने एका टोकाकडून डावाची सूत्रे हाती घेतली आणि शेवटपर्यंत फलंदाजी करून ६० चेंडूंत ७४ धावांची नाबाद खेळी साकारली. मात्र इतर फलंदाजांना मोठी खेळी करण्यात अपयश आले. त्यामुळे चेन्नईने ७ बाद १५८ धावांपर्यंत मजल मारली.

लक्ष्याचा पाठलाग करताना गुजरातचे सलामीवीर शुभमन गिल आणि साई सुदर्शन यांनी शानदार सुरुवात करून दिली. या जोडीने पहिल्या गड्यासाठी ५८ धावांची भागीदारी रचली. ३३ धावांची खेळी साकारल्यानंतर गिल तंबूत परतला. त्यानंतर सुदर्शनला जोस बटलरची साथ लाभली. दुसऱ्या गड्यासाठी त्यांनी ६० चेंडूंत ९७ धावांची भागीदारी करून हा सामना पूर्णपणे एकतर्फी बनवला. साई सुदर्शन ८७ धावांची खेळी करून बाद झाला. अखेर बटलरने ३९ धावा आणि वॉशिंग्टन सुंदर १ धाव करून नाबाद राहिल्याने गुजरातने १५९ धावांचे लक्ष्य २० चेंडू शिल्लक राखून पूर्ण केले.

## दिल्लीच्या लुंगी एन्गिडीला रुग्णालयातून डिस्चार्ज

■ नवी दिल्ली


**दिल्ली** कॅपिटल्सचा वेगवान गोलंदाज लुंगी एन्गिडीला काल रात्री उशिरा रुग्णालयातून डिस्चार्ज देण्यात आला. दिल्लीत पंजाब किंग्जविरुद्ध खेळल्या गेलेल्या सामन्यात झेल पकडताना त्याचे डोके जमिनीवर आदळले आणि तो जखमी झाला. त्यासाठी मैदानावर रुग्णवाहिका आणली आणि त्याला रुग्णालयात नेले. तपासणीत त्याच्या पाठीच्या कण्याला किंवा मेंदूला कोणतीही गंभीर दुखापत आढळली नाही. काही तासांच्या निरीक्षणाखाली त्याची प्रकृती स्थिर आढळली आणि त्याला डिस्चार्ज दिला.

## बंगळुरुचा दुसरे स्थान भक्कम करण्याचा प्रयत्न
## आज दिल्ली कॅपिटल्स संघाशी लढत होणार

■ नवी दिल्ली

**दिल्लीच्या** अरुण जेटली स्टेडियमवर उद्या आयपीएलच्या ३९ व्या सामन्यात दिल्ली कॅपिटल्स आणि रॉयल चॅलेंजर्स बंगळुरु आमनेसामने येणार आहेत. बंगळुरु हा सामना जिंकून आयपीएलच्या गुणतालिकेतील आपले दुसरे स्थान अधिक भक्कम करण्याचा प्रयत्न करणार आहे, तर दिल्ली आपले प्लेऑफचे आव्हान कायम ठेवण्यासाठी सज्ज झाला आहे. आयपीएलमध्ये सर्वाधिक धावा करणारा पहिला फलंदाज होण्यापासून बंगळुरुचा सलामीवीर विराट कोहली फक्त ११ धावा दूर आहे.

आयपीएलच्या या हंगामात बंगळुरु आतापर्यंत ७ सामने खेळले आहेत. त्यातील ५ सामन्यांत बंगळुरुने विजय मिळवला, तर २ सामन्यांत पराभव पत्करावा लागल्यामुळे



बंगळुरु गुणतालिकेत १० गुणांसह दुसऱ्या स्थानावर आहे. दिल्लीनेही ७ सामन्यांत आपले नशीब आजमावले आहे. त्यातील ४ सामन्यांत पराभव आणि ३ सामन्यांत विजय मिळवला. परिणामी दिल्ली गुणतालिकेत ६ गुणांसह सहाव्या स्थानावर आहे. हा सामना दिल्लीच्या संयमाची कसोटी असेल आणि बंगळुरूसाठी आपले वर्चस्व सिद्ध करण्याची एक संधी असेल. आपली सर्वोच्च धावसंख्या उभारूनही दिल्लीला शनिवारी पंजाबविरुद्ध विजय मिळवता आला नाही. हा सामना जिंकायचा असेल तर दिल्लीच्या गोलंदाजांना सर्वोत्तम कामगिरी करावी लागेल. वेगवान गोलंदाज आकिब नबी, मनगटी फिरकी गोलंदाज कुलदीप आणि कर्णधार अक्षर यांना बळी घ्यावे लागतील.

## कॅरम स्पर्धेत प्रसन्न गोळे विजेता ठरला

■ मुंबई

**आनंदराव** अडसूळ चॅरिटेबल ट्रस्ट, को-ऑपरेटिव्ह बँक एम्प्लॉईज युनियन आणि आयडियल स्पोर्ट्स अकॅडमीतर्फे महाराष्ट्र दिन व कामगार दिनानिमित्तच्या विनाशुल्क दुसऱ्या टप्प्यातील शालेय कॅरम स्पर्धेत राष्ट्रीय दर्जाचा सबज्युनियर कॅरमपटू प्रसन्न गोळे विजेता ठरला. मालाडमधील पोद्दार अकॅडमी स्कूलच्या प्रसन्न गोळेने अचूक फटके साधत राणीवर सतत कब्जा मिळवून गुणांची आघाडी वाढविली. त्यामुळे दबावाखाली खेळणाऱ्या व्ही.एन. सुळे गुरुजी शाळेच्या ग्रीष्मा धामणकरचे आव्हान प्रसन्न गोळेने १८-० असे सहज संपुष्टात आणले. परिणामी ग्रीष्मा धामणकरला उपविजेतेपदावर समाधान मानावे लागले.

तत्पूर्वी उपांत्य फेरीच्या अटीतटीमधील सामन्यात ग्रीष्मा धामणकरने ध्रुव भालेरावला ६-५ आणि प्रसन्न गोळेने पुष्कर गोळेला ८-७ असे हरविले. दादर पश्चिम येथील सीबीईयु सभागृहात झालेल्या विविध जिल्ह्यांतील खेळाडूंच्या स्पर्धेत पोद्दार अकादमी शाळेच्या पुष्कर गोळे आणि अँटोनियो डिसिल्व्हा हायस्कूलच्या ध्रुव भालेरावने उपांत्य उपविजेतेपद तर पार्ले टिळक विद्यालयाच्या अमेय जंगम, चिल्ड्रेन अकॅडमी स्कूलच्या रासेश सयानी, दहिसरमधील ठाकूर रामनारायण पब्लिक स्कूलच्या तीर्थ ठाकर व शैलेश यादव



यांनी उपांत्यपूर्व उपविजेतेपद मिळविले. को-ऑपरेटिव्ह बँक एम्प्लॉईज युनियनचे उपाध्यक्ष अशोक नवले, चंद्रकांत करंगुटकर, अविनाश महाडिक, शिवछत्रपती पुरस्कार विजेते लीलाधर चव्हाण आदींच्या उपस्थितीत विजेत्या-उपविजेत्यांना गौरविण्यात आले. निवड झालेल्या शालेय खेळाडूंची सांघिक कॅरम स्पर्धा १ ते ३ मे दरम्यान दादरमध्ये रंगणार आहे.

# श्रद्धा आणि नेहाला क्लीन चिट मिळणार?

अभिनेत्री श्रद्धा कपूर आणि नोरा फतेही यांना २०२२ मधील अमली पदार्थ प्रकरणात मुंबई पोलिसांनी दिलासा दिला असून, या प्रकरणाच्या तपासात त्यांच्याविरुद्ध कोणतेही ठोस पुरावे न मिळाल्याने त्यांना क्लीन चिट मिळण्याचे संकेत आहेत.

हे संपूर्ण प्रकरण ऑगस्ट २०२२ मध्ये सुरू झाले होते, जेव्हा अमली पदार्थ विरोधी पथकाने मोहम्मद सलीम शेख नावाच्या तस्कराला




अटक केली होती. त्याच्याकडून मेफेड्रोन जप्त केल्यानंतर झालेल्या चौकशीत त्याने काही बड्या नावांचा उल्लेख केला होता. त्या आधारे २०२५ मध्ये श्रद्धा आणि नोरा यांची चौकशी करण्यात आली होती. मात्र तपासाअंती या अभिनेत्रींचा अमली पदार्थ पुरवठा साखळीशी कोणताही संबंध असल्याचे पुरावे पोलिसांच्या हाती लागलेले नाहीत.

या प्रकरणातील मुख्य आरोपींविरुद्ध पोलिसांचा तपास सुरूच राहणार असला, तरी चित्रपटसृष्टीतील या नामांकित व्यक्तींना आता कायदेशीर प्रक्रियेतून मुक्तता मिळणार असल्याचे स्पष्ट झाले आहे.

# अक्षय-प्रियदर्शनची नवी धमाल

अक्षय कुमार आणि दिग्दर्शक प्रियदर्शन ही जोडी पुन्हा एकदा प्रेक्षकांचे मनोरंजन करण्यासाठी सज्ज झाली असून, 'भूत बंगला' आणि 'हैवान' नंतर ते तिसऱ्या चित्रपटासाठी एकत्र येणार आहेत. 'टिप्स फिल्म्स' या निर्मिती संस्थेच्या बॅनरखाली या नव्या चित्रपटाची निर्मिती होणार असल्याचे वृत्त समोर आले आहे. विशेष म्हणजे प्रियदर्शन आणि टिप्स फिल्म्स पहिल्यांदाच एकत्र काम करत आहेत.

सध्या 'भूत बंगला' बॉक्स ऑफिसवर चांगली कामगिरी करत आहे आणि 'हैवान' या चित्रपटाचे चित्रीकरणही पूर्ण झाले आहे. या यशानंतर प्रियदर्शन यांनी आपल्या आगामी कामाचा वेग वाढवला असून, त्यांनी अक्षय



कुमारसोबत या नव्या विनोदी चित्रपटाचे नियोजन केले आहे. हा चित्रपट तरुण आणि कौटुंबिक प्रेक्षकांना डोळ्यासमोर ठेवून तयार करण्यात येणार असून, तो प्रियदर्शन यांच्या खास शैलीतील मनोरंजक चित्रपट असेल.

या जोडीने आतापर्यंत 'हेरा फेरी', 'गरम मसाला', 'भागम भाग', 'भूल भुलैया', 'दे दना दन', 'खट्टा मीठा' आणि 'भूत बंगला' अशा ७ यशस्वी चित्रपटांमध्ये एकत्र काम केले आहे. 'हैवान' हा त्यांचा आठवा चित्रपट ठरेल, तर टिप्स फिल्म्सचा हा प्रकल्प त्यांच्या एकत्रित वाटचालीतील नववा चित्रपट असेल. याशिवाय कायदेशीर प्रश्न सुटल्यानंतर ते 'हेरा फेरी ३' वरही काम सुरू करणार आहेत.

# सनी-फरहानचा हाय कॉन्सेप्ट चित्रपट

अभिनेता सनी देओल आणि फरहान अख्तर व रितेश सिधवानी यांची निर्मिती संस्था 'एक्सल एंटरटेनमेंट' एका नवीन चित्रपटासाठी एकत्र येत आहेत. या चित्रपटाचे स्वरूप अतिशय भव्य असून, तो एक 'हाय-कॉन्सेप्ट' प्रकल्प असल्याचे सांगण्यात येत आहे. हा चित्रपट महत्त्वाकांक्षी प्रकल्प असून, या दोघांच्या पहिल्याच सहकार्यामुळे प्रेक्षकांमध्ये आणि उद्योगात कमालीची उत्सुकता आहे.

विशेष म्हणजे, याच निर्मिती संस्थेच्या बॅनरखाली ए. आर. मुरुगदॉस यांच्या मार्गदर्शनाखाली सनी देओल एका ॲक्शन-थ्रिलर चित्रपटावरही काम करत आहे, ज्याचे चित्रीकरण फेब्रुवारी २०२६ पासून सुरू झाले आहे. मात्र, 'एक्सल एंटरटेनमेंट'सोबतचा हा नवीन 'हाय-कॉन्सेप्ट' चित्रपट एक वेगळा प्रकल्प असल्याचे समजते.

सनी देओलच्या पडद्यावरील प्रतिमेला एका वेगळ्या उंचीवर नेणारा ठरू शकतो, अशी चर्चा चित्रपट वर्तुळात आहे.

सध्या या चित्रपटाचे तपशील अत्यंत गोपनीय ठेवण्यात आले आहेत. चित्रपटाची कथा, शैली, दिग्दर्शक आणि इतर कलाकार यांच्याबद्दलची माहिती अद्याप गुलदस्त्यातच आहे. मात्र, सूत्रांच्या माहितीनुसार, या चित्रपटाचे कथानक सनी देओलच्या नेहमीच्या भूमिकांपेक्षा वेगळे असणार आहे. हा एक मोठ्या प्रमाणावरील



# कृती सेनॉनची



अभिनेत्री आणि उद्योजिका कृती सॅनन हिने आपल्या 'हायफन' या स्किनकेअर ब्रँडच्या 'चीफ कस्टमर ऑफिसर' (सी.सी.ओ.) पदावरून पायउतार होण्याचा निर्णय घेतला आहे. २०२३ मध्ये लाँच झालेल्या या ब्रँडच्या सुरुवातीपासूनच कृती सॅनन या पदावर कार्यरत होती आणि ब्रँडच्या जडणघडणीत तिचा मोठा वाटा होता. मात्र, आता कंपनीने अधिकृतपणे ती या पदावर नसल्याची घोषणा केली आहे.

कंपनीने ब्रँडच्या भविष्यातील वाटचालीसाठी आणि अंतर्गत पुनर्रचनेसाठी हा निर्णय घेण्यात आला असल्याचे स्पष्ट केले आहे. या निवडीमागील नेमकी कारणे किंवा कृती सॅननची कंपनीतील पुढील भूमिका काय असेल, याबाबत कंपनीने कोणतीही अधिकृत माहिती दिलेली नाही.

# 'राजा शिवाजी'चा मार्ग मोकळा; पण...

रितेश देशमुख यांची मुख्य भूमिका असलेला 'राजा शिवाजी' हा ऐतिहासिक चित्रपट प्रदर्शनासाठी सज्ज झाला असून, या चित्रपटाचा कालावधी ३ तास १५ मिनिटे आणि ५ सेकंद इतका असल्याचे समोर आले आहे. या प्रदीर्घ कालावधीमुळे हा चित्रपट 'ॲनिमल', 'पुष्पा २', 'धुरंधर' आणि 'बॉर्डर २' यांसारख्या मोठ्या कालावधीच्या आणि यशस्वी ठरलेल्या चित्रपटांच्या विशेष क्लबमध्ये सामील झाला आहे.



सेन्सॉर बोर्डाने (सी.बी.एफ.सी.) या चित्रपटाला 'यू/ए १६+' प्रमाणपत्र दिले असून, चित्रपटामध्ये काही महत्त्वाचे बदल सुचवले आहेत. ऐतिहासिक संदर्भाच्या बाबतीत अधिक स्पष्टता आणण्यासाठी निर्मात्यांना डिस्क्लेमरमध्ये सुधारणा करण्यास आणि आवाजासह स्पष्टीकरण देण्यास सांगण्यात आले आहे. तसेच 'राजा शिवाजी' हे शीर्षक निवडण्याबाबतचे स्पष्टीकरण आणि ऐतिहासिक घटनांच्या तारखांचे उल्लेख पडद्यावर दर्शवण्याच्या सूचनाही देण्यात आल्या आहेत.

सेन्सॉर बोर्डाने एका लहान मुलाचा गळा चिरल्याचे दृश्य योग्य शॉटसह बदलण्याचे आदेश देण्यात आले आहेत. याव्यतिरिक्त ऐतिहासिक संदर्भांसाठी आवश्यक कागदपत्रे आणि संवादांनुसार पटकथा सादर करण्याचे निर्देश निर्मात्यांना देण्यात आले आहेत.

# अखेर 'खलनायक' परतणार!

मुंबईत आयोजित एका विशेष कार्यक्रमात संजय दत्त, सुभाष घई, जिओ स्टुडिओजच्या ज्योती देशपांडे आणि ॲस्पेक्ट ग्लोबलच्या अक्ष कंबोज यांनी 'खलनायक रिटर्न्स'ची अधिकृत घोषणा केली आहे. संजय दत्तच्या 'थ्री डायमेंशन मोशन पिक्चर्स' अंतर्गत या चित्रपटाची निर्मिती होणार असून, १९९३ च्या सुपरहिट 'खलनायक' चित्रपटाचा हा दुसरा भाग असेल.

या कार्यक्रमादरम्यान पत्रकारांशी संवाद साधताना सुभाष घई यांनी यावेळी संजय दत्तच्या सुरुवातीच्या काळातील आठवणींना उजाळा दिला. 'विधाता' चित्रपटाच्या वेळी संजय दत्तला अभिनयात फारसा रस नव्हता आणि त्याला फक्त मोटारसायकल चालवायला आवडायचे, असा




किस्सा त्यांनी सांगितला. मात्र काळानुसार संजयने अभिनयाला गांभीर्याने घेतले आणि 'सडक', 'साजन' यांसारख्या चित्रपटांतून स्वतःला सिद्ध केले. 'खलनायक' चित्रपटासाठी अनेक मोठे कलाकार उत्सुक असतानाही, सुभाष घई यांनी संजय दत्तवरच विश्वास दाखवला होता. यावर मिश्किल टिप्पणी करताना संजय दत्त म्हणाला की, सुभाषजींनी मला चित्रपटाची कथा कधीच सांगितली नाही, त्यांनी फक्त सांगितले की तुला हा चित्रपट करायचा आहे आणि मी तो केला.

## हेल्दी Me

# ब्लूटूथ इअरफोन्समुळे ब्रेन ट्युमर होतो?

**डॉ. रूपा जुथानी,**
न्युरोसर्जन



**आजच्या** धावपळीच्या युगात ब्लूटूथ इअरफोन्स हा आपल्या आयुष्याचा अविभाज्य भाग बनले आहेत. प्रवासात असो वा कार्यालयात, हे उपकरण सतत आपल्या कानाशी जोडलेले असते. मात्र, याच वाढत्या वापरासोबत रेडिएशन आणि मेंदूच्या कर्करोगाच्या (ट्युमर) जोखमीबाबत अनेक चर्चांना उधाण आले आहे. तथापि, ही केवळ एक भीती असून, याला कोणताही शास्त्रीय आधार नाही. चार वर्षांपूर्वी म्हणजे २०२२ मध्ये अद्ययावत केलेल्या एका व्यापक संशोधनात सुमारे दहा लाख महिलांच्या १४ वर्षांच्या डेटाचा अभ्यास करण्यात आला होता. या प्रदीर्घ संशोधनानंतर ब्लूटूथचा वापर आणि मेंदूचा कर्करोग यांचा कोणताही परस्पर संबंध आढळून आलेला नाही. त्यामुळे सामान्य वापरासाठी ही उपकरणे सुरक्षित मानली जातात.

ब्लूटूथ उपकरणांमधून उत्सर्जित होणारे रेडिएशन हे 'नॉन-आयोनाइजिंग' प्रकारचे असते. क्ष-किरण (एक्स-रे) सारख्या घातक किरणांच्या उलट, हे सौम्य रेडिएशन आपल्या शरीरातील पेशींच्या 'डीएनए'ला कोणतीही इजा पोहोचवत नाही. पेशींमधील 'डीएनए'ची हानी न झाल्यामुळे कर्करोगाची गाठ निर्माण होण्याची शक्यता उरत नाही.

एक महत्त्वाची बाब म्हणजे, आपण जेव्हा मोबाईल फोन थेट कानाला लावून बोलतो, तेव्हा रेडिएशनचा धोका अधिक असतो. फोन चार्ज होत असताना किंवा कॉल जोडला जात असताना त्यातून सर्वाधिक लहरी बाहेर पडतात. अशा वेळी फोन डोक्यापासून काही अंतरावर ठेवणे हिताचे ठरते. त्यामुळे थेट फोन कानाला लावण्यापेक्षा इअरफोन्स वापरणे हा अधिक सुरक्षित पर्याय ठरतो.

आपल्या श्रवणशक्तीच्या सुरक्षेसाठी फोन 'स्पीकर'वर ठेवून बोलणे हा सर्वोत्तम मार्ग आहे. मात्र, सार्वजनिक ठिकाणी हे शक्य नसल्यास हेडफोन्सचा वापर करावा. संशोधनानुसार, फोन थेट कानाला लावल्यामुळे हियरिंग नर्व्हवर जे परिणाम होतात, ते हेडफोन्स वापरल्यास टाळता येतात. कोणत्याही तंत्रज्ञानाचा वापर मर्यादित आणि आवश्यकतेनुसार करणे हेच उत्तम आरोग्याचे सूत्र आहे.

## हेल्दी टिप्स



◂ जायफळ हा मसाल्याच्या पदार्थातील सुगंधी जिन्नस. विविध पदार्थांमध्ये स्वाद, सुगंधाकरिता याचा वापर होतो. शिवाय लहान मुलांचे पोट बिघडले असल्यास त्यांनाही थोड्या प्रमाणात दुधातून जायफळ उगाळून दिल्यास पोटदुखीबरोबरच जुलाब थांबण्यासही मदत होते. त्याचबरोबर जायफळाचे तेलही खूप प्रभावी औषध म्हणून वापरण्यात येते. जायफळाच्या तेलात अँटीइन्फ्लमेटरी म्हणजे दाह कमी करण्याचे गुण असतात. त्यामुळेच स्नायू आणि सांध्यांच्या वेदना यांच्यापासून आराम मिळवण्याचा सहजसोपा मार्ग म्हणून याकडे पाहू शकतो. शरीराच्या ज्या भागाचा दाह होतो आहे तिथे या तेलाने मालिश केल्यास आराम मिळतो. हे तेल आर्थ्रायटिससारख्या आजारांमध्ये वेदना आणि सूज दूर करण्यासाठी प्रभावी आहे.



◂ शिमला मिरची किंवा ढोबळी मिरची ही प्रतिकार क्षमता मजबूत करण्यास मदत करते. ढोबळी मिरचीमध्ये सी जीवनसत्त्वाचे प्रमाण भरपूर असते. ढोबळी मिरची मेंदूच्या कार्यासाठी फायदेशीर असते. तसेच ताण कमी करणे, अस्थमा आणि कर्करोग यांसारख्या आजारांमध्येही ती फायदेशीर आहे. कॅलरी कॉन्शस लोकांनाही ढोबळी मिरची चालू शकते. कारण ढोबळी मिरचीमध्ये कॅलरीचे प्रमाण खूप कमी असते. त्यामुळेच ही मिरची खाल्ल्याने वजन वाढण्याची शक्यता खूप कमी असते. सिमला मिरचीमुळे चयापचय क्षमता चांगली होते.

# लघवीतून रक्तस्त्राव होत असल्यास...

शरीरातील टाकाऊ पदार्थ लघवीवाटे बाहेर टाकले जातात. परंतु जेव्हा या लघवीतून रक्ताचे अंश दिसू लागतात, तेव्हा ती धोक्याची घंटा समजावी. वैद्यकीय भाषेत या स्थितीला 'हेमेट्युरिया' असे संबोधले जाते. लघवीतून रक्त येणे हे संसर्गाचे किंवा मूतखड्याचे लक्षण असू शकते. काही प्रसंगी ते मूत्राशयाच्या कर्करोगाचे (ब्लॅडर कॅन्सर) प्रमुख लक्षणही असू शकते. विशेषतः जेव्हा हा रक्तस्त्राव कोणत्याही वेदनेशिवाय होतो, तेव्हा तो कर्करोगाचा सर्वात मोठा संकेत मानला जातो.



मूत्राशयाच्या कर्करोगाचे सर्वात फसवे वैशिष्ट्य म्हणजे यात होणारा रक्तस्त्राव अनेकदा वेदनाहीन असतो. रुग्णाला कोणतीही शारीरिक कळ सोसावी लागत नाही. त्यामुळे अनेकदा याकडे दुर्लक्ष केले जाते. लघवीचा रंग लाल किंवा गुलाबी होणे हा मूत्राशयातील पेशींच्या अनियंत्रित वाढीचा परिणाम असू शकतो. तज्ज्ञांच्या मते, जर लघवीतून वारंवार रक्त येत असेल आणि त्यासोबत वेदना होत नसतील, तर तातडीने तपासणी करणे अनिवार्य आहे.

### जोखमीचे घटक आणि कारणे

मूत्राशय हा शरीरातील लघवी साठवणारा महत्त्वाचा अवयव आहे. या कर्करोगाचा उगम प्रामुख्याने मूत्राशयाच्या आतील अस्तरापासून होतो.

तंबाखूतील घातक रसायने लघवीवाटे मूत्राशयात पोहोचतात आणि तिथल्या पेशींना इजा पोहोचवतात. हे या कर्करोगाचे सर्वात मोठे कारण मानले जाते. विशिष्ट उद्योगांमध्ये काम करणाऱ्या व्यक्ती, ज्यांचा रसायनांशी सतत संबंध येतो, त्यांना याचा अधिक धोका असतो. याशिवाय वाढते वय आणि वारंवार होणारे मूत्रमार्गाचे संसर्ग (यूटीआय) यामुळेही मूत्राशयाच्या कर्करोगाची शक्यता वाढते.

# केसांच्या समस्या आणि अंतर्गत पोषण



**बहुतांश** लोक केसांच्या बाह्य उपचारांवर भर देतात. मात्र अंतर्गत पोषण हेच केसांच्या वाढीसाठी आणि मजबुतीसाठी पाया ठरते, असे सेलिब्रेटी आहारतज्ज्ञ ऋजुता दिवेकर यांचे मत आहे. त्यांनी यासाठी सुचवलेले मुख्य आहार घटक खालीलप्रमाणे आहेत:

**१. भाताचा आहारात समावेश** : अनेकदा वजन वाढण्याच्या भीतीने लोक भात खाणे टाळतात. मात्र, ऋजुता यांच्या मते दिवसातून किमान एकदा भात खाणे आवश्यक आहे. भातामुळे वजन वाढत नाही, उलट तो शरीराच्या आणि केसांच्या आरोग्यासाठी अत्यंत पोषक ठरतो.

**२. हंगामी फळे** : आवळा, पेरू, आंबा यांसारखी हंगामी फळे केसांच्या मुळांना नैसर्गिकरित्या पोषण देतात. या फळांमध्ये असलेल्या 'क' जीवनसत्वामुळे लोह शोषले जाण्यास मदत होते. परिणामी रक्तातील हिमोग्लोबिनची पातळी सुधारते. हिमोग्लोबिनची पातळी योग्य असल्यास केसांचा रंग, घनता आणि मजबुती टिकून राहते.

**३. कडधान्ये आणि डाळी** : मुग, तुरीची डाळ, चवळी यांसारख्या कडधान्यांमध्ये ॲमिनो ॲसिड्स, 'ब' जीवनसत्व आणि तंतुमय पदार्थांचे (फायबर) प्रमाण भरपूर असते. हे घटक केसांना आतून ताकद देतात आणि केस गळती रोखण्यास मदत करतात.

**४. अळीवाच्या बियांचे महत्त्व** : केस आणि त्वचेच्या आरोग्यासाठी अळीव बिया अत्यंत गुणकारी आहेत. या बियांपासून लोह आणि फॉलिक ॲसिड मिळते. मात्र, या बिया सकाळी रिकाम्या पोटी पाण्यासोबत न घेता, त्याचे लाडू किंवा खीर करून खाण्याचा सल्ला त्यांनी दिला आहे.

**५. केसांची निगा आणि तेल मालिश** : केवळ आहारच नाही, तर बाह्य निगा राखणेही तितकेच महत्त्वाचे आहे. आठवड्यातून किमान एकदा ३० मिनिटे केसांना तेल लावून मालिश करावी. तसेच दररोज केस विंचरणे आणि रासायनिक प्रक्रिया टाळणे केसांच्या आरोग्यासाठी हिताचे ठरते.




# समस्या धाप लागण्याची

**पायऱ्या** चढल्यानंतर किंवा वेगाने चालल्यानंतर धाप लागणे हा एक सामान्य अनुभव आहे. मात्र, जेव्हा ही समस्या वारंवार किंवा विनाकारण जाणवू लागते, तेव्हा त्याकडे दुर्लक्ष करणे धोक्याचे ठरू शकते. वैद्यकीय भाषेत या त्रासाला 'डिस्पनिया' असे म्हणतात. ही समस्या केवळ फुफ्फुसांशी संबंधित नसून हृदयविकार, रक्ताल्पता



किंवा मानसिक तणावाचे लक्षणही असू शकते.

मानसिक तणाव आणि 'पॅनिक अटॅक'मुळे श्वास फुलू शकतो. एखादी व्यक्ती प्रचंड तणाव, भीती किंवा घबराट अनुभवते, तेव्हा शरीरातील श्वास घेण्याची गती अचानक बदलते. पॅनिक अटॅक दरम्यान हृदयाचे ठोके वेगाने वाढतात आणि व्यक्तीला श्वास गुदमरल्यासारखे वाटते. ही स्थिती पूर्णपणे मानसिक आरोग्याशी संबंधित असली तरी त्याचे शारीरिक परिणाम अत्यंत तीव्र असतात.




काही आरोग्य अभ्यासांनुसार, धाप लागण्याची तक्रार महिलांमध्ये पुरुषांच्या तुलनेत अधिक दिसून येते. हार्मोनल बदल, चिंता आणि तणाव घेण्याची अधिक प्रवृत्ती यामुळे महिलांना हा त्रास जास्त जाणवू शकतो. तसेच, गर्भधारणेदरम्यान शरीराला ऑक्सिजनची गरज वाढते आणि गर्भाशयाचा दाब फुफ्फुसांवर पडतो, ज्यामुळे श्वास घेण्यास जडपणा जाणवतो. शरीरातील रक्ताचे कमी प्रमाण हे देखील महिलांमधील धाप लागण्याचे एक मुख्य कारण आहे.

### पुरुषांमधील कारणे:

पुरुषांमध्ये ही समस्या अनेकदा जीवनशैलीशी संबंधित असते. दीर्घकाळ धूम्रपान केल्यामुळे फुफ्फुसांची कार्यक्षमता कमी होते. यामुळे 'सीओपीडी' किंवा फुफ्फुसांच्या संसर्गाचा धोका वाढतो. पुरुषांमध्ये शारीरिक श्रमामुळे किंवा हृदयविकारामुळे धाप लागण्याचे प्रमाण अधिक असू शकते. हृदयाचे स्नायू कमकुवत झाल्यास किंवा रक्त पंप करण्याची क्षमता कमी झाल्यास शरीरातील ऊतींपर्यंत पुरेसा ऑक्सिजन पोहोचत नाही. अशा वेळी फुफ्फुसांमध्ये द्रव जमा होऊ लागतो आणि श्वास घेताना जडपणा जाणवतो.

हा त्रास अनेक आठवड्यांपासून टिकून असेल किंवा त्यासोबत छातीत दुखणे, चक्कर येणे आणि प्रचंड थकवा जाणवत असेल, तर त्वरित तज्ज्ञांचा सल्ला घ्यावा. वेळेवर केलेली तपासणी मूळ कारणाचा शोध घेण्यास आणि पुढील गंभीर आजार रोखण्यास मदत करते.

# नवाकाळ शब्दकोडे–१५८८



**आडवे शब्द –**

२. रामदासस्वामींचा प्रसिद्ध ग्रंथ ५. क्षणभर विश्रांती, थोडा आराम ८. विशाल, मोठे १०. एक स्वयंप्रकाशी कीटक १३. भस्मसात, जळालेले १४. भयंकर १६. पंचकर्मपैकी वासंतिक कर्म १८. अवैध कमाई २०. काष्ठ २२. घोट २३. वास्तव २४. गोड २५. चॉकलेटचा मुख्य घटक २६. भाक ३१. मळकेपणा, मालिन्य ३२. उसाचा रस काढण्याचे साधन ३४. बंगालची देवी ३५. जाणता अजाणता ३८. सळई, मुलींचे एक नाव ४०. प्रशंसा ४१. फोडणीचा धुरळा ४२. श्रीरामाचा पुत्र ४४. देह ४५. रांजण ४७. अथवा ४८. मोफत ४९. वर्षाव, सरबत्ती ५२. शिक्का, प्रभाव ५४. राष्ट्र ५५. गहू, तांदूळ इ. चे सत्त्व ५६. हरिणाप्रमाणे आकर्षक नेत्र असलेली ५८. नौका, नाम ६०. वाहनात असलेले अतिरिक्त चाक ६१. पक्षी ६२. रमलेला ६३. पिशाच्च ६४. नातलग ६५. नेत्रकटाक्ष ६७. चिखल ६८. कपाळाला झालेली जखम ७०. अग्नी ७१. शर्त ७३. चमत्कारिक ७५. 'नाम घेता मुखी राघवाचे....' ७९. ठोक, मार ८०. खूप ८१. हिंदीत लाचलुचपत ८२. पोळीचा चतुर्थांश ८४. पालखी ८५. कयास ८६. तनया ८७. पाठीतल्या हाडांच्या माळेतील एकेक ८९. तोटी ९१. सैनिक ९३. दूध पूर्ण आटवून केलेला ९४. मोठा भाऊ ९५. कोल्हापुरी दागिना ९६. साधना करणारा ९७. पक्षीसमूह ९९. विमानातील सेविका १०१. पाणी १०२. केतूसमान ग्रह १०३. पूर्वीची लेखणी, ही शाईत बुडवून लेखन करीत १०४. सर्कशीत शारीरिक कसरती करणारा

**उभे शब्द –**

१. 'जे का रंजले गांजले, त्यासी म्हणे जो आपुले....' (संत तुकाराम) २. दृष्टांत ३. बकरा ४. जमीन ६. हळू ७. डावा ९. नीटनेटका १०. कावळा ११. झुंड १२. ढोल्या गणपतीचे गाव १५. पंचेचाळीसपेक्षा कमी अंशाचा कोन १७. अननुभवी १९. मदनाची स्त्री २१. विहीर २५. जळते लाकूड २७. फटफजिती २८. हल्ली २९. ओवाळून टाकलेला पदार्थ, उपाय ३०. चंगळ ३१. कपाळभर लावलेले कुंकू ३१अ. हिंदीत पत्ते ३३. नाभिमध्ये कस्तुरी असलेले हरीण ३६. बुरुज ३७. गोंगाट ३९. अनावर जमाव आवरण्यासाठी पहिला पोलिसी उपाय ४३. जे होणे शक्य आहे ते ४६. खरबरीत ५०. वाहनात सामान ठेवण्याची जागा इंग्रजीत ५१. संयमपूर्ण ५३. सुरुवातीपासून अखेरपर्यंत ५५. सूर्य ५६. हरीण ५७. पापी लोक मेल्यावर इथे जातात अशी समजूत आहे ५८. विविध ५९. खराब ६१. पेटीचा कप्पा ६३. क्षुधा ६६. पुरवायलाच लागतात असे तीन हट्ट- राजहट्ट, स्त्रीहट्ट आणि ×××× ६७. जेवायला बसलेल्यांची रांग ६८. नुकसान, तोटा ६९. चोरून दिलेले प्रोत्साहन ७०. बोलावणे ७१. निश्चेष्ट, जीव नसलेले ७२. लोणी कढवल्यावर तयार होणारे, घृत ७४. त्रासलेला ७५. पांगापांग ७६. पोपट ७७. नमुनेदार ७८. नृत्य ७९. शर्विलक ८३. शेगडीतले इंधन ८४. भोजनाचा जंगी बेत, दावत ८७. माकडाचा तमाशा करणारा ८८. व्याकूळ ९०. मेंढीचे पिल्लू ९२. सणासुदीला वापरला जाणारा नाकातला मोत्याचा दागिना ९३. बखोट, गचांडी ९४. लाकडी जिना, मुंबईचे एक उपनगर ९८. वायू १००. जुगार

•

**नवाकाळ कोडे क्रमांक १५८७ चे उत्तर**

**आडवे शब्द** : १. अपुरा ३. डागडुजी ६. गोवर्धन पर्वत १२. चिलीम १३. वजा १५. तर १६. पालक १७. होकायंत्र १८. नयनमनोहर २२. बारस २४. कक्ष २६. दास २७. गर्द २८. श्रांत २९. पुष्टी ३०. मस ३२. झाड ३३. दानत ३५. ताकाला ३७. खजील ३९. सलगी ४०. मही ४१. किल्लेदार ४२. रवळी ४३. वरद ४७. सदा ४८. शाप ५०. आढेवेढे ५२. क्षमा ५३. वडवानल ५५. रहित ५६. वासना ५७. नवती ५९. सचिंत ६१. जात ६२. रफू ६८. समानता ७०. विचारी मना तूचि शोधूनि पाहे ७३. जव ७४. खिंडार ७५. लहर ७६. धग ७७. रगड ७९. प्रजा ८०. सुनीत ८२. नव ८४. वातड ८५. ठाव ८८. यथावकाश ८९. शीतल ९१. गंगा ९२. कलंदर ९३. वेज ९३अ. टोकदार ९५. पथिक ९८. अवघड ९९. चाप १००. शेवट १०१. तरबेज

**उभे शब्द** : २. पुत्रकामेष्टी ३. डाली ४. गमन ५. जीवनसत्त्व ७. वराह ८. नत ९. परवा १०. तपास ११. अकस्मात तोही पुढे जात आहे १२. चित्रक १४. जाम १९. यदा २०. नोटा २१. रगड २३. रवानगी २५. क्षमता २९. पुलकित ३१. सकार ३२. झालर ३३. दालन ३४. उदास ३६. लावण्यवती ३८. जीवदान ४४. दशा ४५. वेढे ४६. समान ४७. सवाल ४९. परत ५०. आतप ५१. धुसफूस ५४. लस ५६. वार ५८. वर्ज्य ६०. चिंतातूर ६३. अनवरत ६४. विचारप्रवर्तक ६५. विमल ६६. अशोभनीय ६७. जनित्र ६९. माज ७०. विडा ७१. नाहक ७२. मधमाशी ७४. खिंड ७८. गडगंज ८१. तथाकथित ८२. नकार ८३. वश ८४. वाल ८६. सुकर ८७. पदरव ९०. तलाव ९३. वेड ९३अ. टोप ९४. दासी ९६. कर ९७. द्विज

# अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्यावर गोळीबार

पान १ वरून

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प, पत्नी मेलानिया आणि उपराष्ट्रपती जेडी वान्स यांच्यासह स्कॉट बेसेंट, एफबीआय प्रमुख काश पटेल, सुरक्षा मंत्री पीट हेगसेथ, परराष्ट्र मंत्री मार्को रूबियो, विटकॉफ असे त्यांचे पूर्ण मंत्रिमंडळ आणि अनेक मोठे अधिकारी उपस्थित होते. याशिवाय जवळजवळ २,५०० पाहुणे उपस्थित होते. बॉलरूममध्ये डिनर सुरू झाले. एक अधिकारी ट्रम्प आणि मेलोनिया यांना कागदावर लिहिलेले काहीतरी सांगत होते. तेवढ्यात गोळीबाराचा आवाज ऐकू आला. तो आवाज ऐकून ट्रम्प यांच्या शेजारील महिला दचकली. बॉलरूममध्ये असलेले पाहुणेही घाबरले. सुरुवातीला त्यांना काही कळले नाही. मात्र काही क्षणात हा गोळीबाराचा आवाज असल्याचे कळल्यावर एकच गोंधळ उडाला. सर्वचजण टेबलच्या खाली, खुर्च्यांमागे लपू लागले. सुरक्षारक्षकांनी ट्रम्प, त्यांच्या पत्नी मेलानिया आणि उपराष्ट्रपती जेडी वान्स यांना गराडा घालून घाईघाईने तिथून बाहेर काढले. यानंतर बॉलरूममध्ये उपस्थित असलेल्या इतरांनाही सुरक्षितपणे बाहेर काढून सुरक्षा रक्षकांनी हॉटेलचा ताबा घेतला. सुरक्षारक्षकांनी हल्लेखोराला तो बॉलरूममध्ये येण्याच्या आत ताब्यात घेतले. त्यामुळे मोठा अनर्थ टळला. १९८१ साली याच हिल्टन हॉटेलात रोनाल्ड रिगन यांच्यावर हल्ला झाला होता.

हॉटेलमधून सुखरूप बाहेर पडल्यानंतर ट्रम्प यांनी सोशल मीडियावर पोस्ट करून माहिती दिली की, वॉशिंग्टनमधील आजच्या संध्याकाळी सीक्रेट सर्व्हिस आणि कायद्याची अंमलबजावणी करणाऱ्या यंत्रणांनी उत्कृष्ट काम केले. त्यांनी त्वरेने आणि धाडसाने कारवाई केली. हल्लाखोराला पकडण्यात आले आहे. मी सुचवले आहे की, हा कार्यक्रम सुरू ठेवावा. मात्र, ही संध्याकाळ नेहमीपेक्षा वेगळी असणार आहे. आपल्याला हा कार्यक्रम पुन्हा करावा लागणार आहे.

हल्ल्याच्या सुमारे दीड तासातच ट्रम्प यांनी माध्यमांनाही संबोधित केले. त्यावेळी ते म्हणाले, हा अमेरिकेच्या संविधानावर हल्ला होता. सिक्रेट सर्व्हिसने माझा जीव वाचवला. सुरक्षा कर्मचाऱ्यांनी शौर्याने काम केले. एका अधिकाऱ्याला गोळी लागली. मी आत्ताच त्याच्याशी बोललो. तो सुरक्षित आहे. त्याने बुलेटप्रूफ जॅकेट घातले होते. हल्लेखोराजवळ शक्तिशाली बंदूक होती. कॅलिफोर्नियात राहणाऱ्या या हल्लेखोराला पकडण्यात आले. तो एकटाच होता. तो मानसिकदृष्ट्या विकृत होता. या हल्ल्याचा इराणशी संबंध नसावा. गेल्या काही वर्षांत आपल्या प्रजासत्ताकावर एका संभाव्य मारेकऱ्याने हल्ला करण्याची ही पहिली वेळ नाही. दोन वर्षांपूर्वी पेनसिल्व्हेनियातील बटलर येथे हत्येचा प्रयत्न झाला होता. काही महिन्यांनी फ्लोरिडातील पाम बीच येथेही मी थोडक्यात बचावलो. कायद्याची अंमलबजावणी करणाऱ्या यंत्रणांनी पुन्हा एकदा उत्तम काम केले. रिपब्लिकन, डेमोक्रॅट, अपक्ष, पुराणमतवादी, उदारमतवादी आणि पुरोगामी सर्वांनी आपल्यातील मतभेद संपुष्टात आणावे.

हिल्टन हॉटेलमध्ये गोळीबार करणाऱ्याचे नाव कोल लन आहे. तो कॅलिफोर्नियातील टॉरन्सचा रहिवासी आहे. ३१ वर्षांचा हा तरुण शिक्षक व व्हिडिओ गेम डेव्हलपर आहे. त्याने कॅलिफोर्निया इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीमधून मेकॅनिकल इंजिनिअरिंगची पदवी घेतली आहे. त्याने संगणक शास्त्रात पदव्युत्तर शिक्षणही पूर्ण केले आहे. २०१४ मध्ये त्याने नासाच्या 'जेट प्रोपल्शन लॅबोरेटरी'मध्ये फेलो म्हणून काम केले आहे. लॉस एंजलीस येथील काऊंटीत त्याला उत्कृष्ट शिक्षकाचा पुरस्कारही मिळाल्याचे सांगण्यात येत आहे. तो डेमोक्रॅट पक्षाचा कार्यकर्ता आहे. २०२४ च्या अध्यक्षीय निवडणुकीवेळी त्याने ट्रम्प यांच्या विरोधात निवडणूक लढणाऱ्या कमला हॅरिस यांना २५ डॉलरची देणगी दिली होती. त्यामुळे या हल्ल्याला राजकीय रंगही चढला आहे. कोलने हा हल्ला का केला, त्याचा उद्देश काय होता, कडक सुरक्षा व्यवस्था असताना एक शॉट गन, एक हॅन्ड गन, एक चाकू, जिवंत काडतूस असे सर्व घेऊन त्याने हिल्टन हॉटेलमधील कार्यक्रमात प्रवेश कसा केला, असे प्रश्न आता विचारले जात आहेत.

प्राथमिक तपासानुसार, कोल हा आधीपासून हिल्टन हॉटेलमध्ये उतरला होता. तो सुरक्षा नसलेल्या एका खोलीतून बॉलरूमपर्यंत आला. त्याने एका पिशवीतून हँडगन आणली होती. बॉलरूमच्या बाहेरपर्यंत पोहोचत त्याने गोळीबार केला. तेव्हा ट्रम्प यांच्यापासून तो केवळ ५० यार्डावर होता. सध्या त्याची चौकशी सुरू आहे. सोमवारी त्याला कोर्टासमोर हजर केले जाणार आहे.

## यापूर्वीचा हल्ल्याचा प्रयत्न

- **१८ जून २०१६** – लास वेगास – पोलिसांची बंदूक हिसकावून एकाचा हल्ल्याचा प्रयत्न हाणून पाडला.
- **२६ जुलै २०१६** – ओहिओ – डिमेसिमा नावाच्या माथेफिरूने सभेत ट्रम्पवर हल्ला केला.
- **५ नोव्हेंबर २०१६** – रेनो, नेवाडा – ट्रम्प भाषण देत असताना एकजण बंदूक हातात घेऊन धावून आला. ट्रम्प स्टेज सोडून गेले.
- **६ सप्टेंबर २०१७** – मंडान, उत्तर डकोटा – फोर्कलिफ्ट ट्रक ट्रम्पच्या ताफ्यात घुसवण्याचा अयशस्वी प्रयत्न झाला.
- **१ ऑक्टोबर २०१८** – पार्सलद्वारे ट्रम्प यांना विषारी रसायनांची पाकिटे पाठवली.
- **१० ऑगस्ट २०२०** – ट्रम्प यांच्या पत्रकार परिषदेपूर्वी एका सशस्त्र तरुणाला सुरक्षारक्षकांनी व्हाईट हाऊसबाहेर ठार केले.
- **१३ जुलै २०२४** – बटलर, पेनसिल्वानिया – जाहीर सभेतील भाषणावेळी थॉमस क्रूक्स नावाच्या तरुणाने ट्रम्प यांच्यावर आठ गोळ्या झाडल्या. त्यातील एक ट्रम्प यांच्या कानाला चाटून गेली.
- **१५ सप्टेंबर २०२४**– पाम बिच, फ्लोरिडा येथे – ट्रम्प गोल्फ खेळत असलेल्या मैदानात तरुण बंदुकीसह झुडूपात लपला होता. सुरक्षारक्षकांनी गोळीबार करताच तो पळाला.

## वाईन बाटल्यांची चोरी

हिल्टन हॉटेलमधील गोळीबारानंतर डिनर कार्यक्रमात आलेल्या पाहुण्यांना हॉटेल रिकामे करण्यास सांगण्यात आले, तेव्हा या खास डिनरसाठी विशेष आमंत्रित असलेल्या अनेक पाहुण्यांनी संधीचा फायदा उचलून महागड्या वाईनच्या बाटल्या लांबवल्या. याचा एक व्हिडिओ व्हायरल झाला असून, त्यात पाहुणे वाईनच्या बाटल्या घेऊन पळताना दिसत आहेत.

# सर्व आरोग्य समित्यांचे पुनरुज्जीवन करण्याचे आरोग्यमंत्र्यांचे निर्देश

मुंबई



**राज्यातील** आरोग्य सेवेच्या गुणवत्तेवर देखरेख करण्यासाठी व नागरिकांना उत्तम आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्यासाठी कार्यरत असलेल्या, रुग्ण कल्याण समिती, जनआरोग्य समिती, महिला आरोग्य समिती, ग्राम आरोग्य पोषण व स्वच्छता समिती, या समित्यांची जबाबदारी महत्त्वाची आहे. सर्वसामान्य नागरिकांना अधिक चांगली व परिणामकारक आरोग्य सेवा देण्यासाठी या सर्व समित्यांचे पुनरुज्जीवन करण्याचे निर्देश आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांनी दिले.

या सर्व समित्यांच्या पुनरुज्जीवन करण्याच्या प्रक्रियेत स्थानिक लोकप्रतिनिधी, प्रशासनातील अधिकारी, कर्मचारी, समाजातील सेवाभावी नागरिक यांनी सहभागी व्हावे. आरोग्यसेवा अधिक परिणामकारक होण्यासाठी लोकसहभाग महत्त्वाचा असून, समित्यांच्या माध्यमातून स्थानिक गरज ओळखून अंमलबजावणी, त्रुटीबाबत त्वरीत उपाययोजना केल्यास नागरिकांना उत्तम आरोग्य सेवा देऊन नागरिकांचा आरोग्य व्यवस्थेवरील विश्वास दृढ होईल. समितीमध्ये नियुक्त सदस्यांनी नियमित बैठका घेवून स्थानिक समस्यांवर कृती आराखडे तयार करावेत. सदस्यांचे प्रशिक्षण व क्षमता बांधणी करावी. तसेच विविध विभागांमध्ये समन्वय साधावा. सर्व लोकप्रतिनिधी, खासदार, आमदार, नगरसेवक, जिल्हा परिषद सदस्य, पंचायत समिती व ग्रामपंचायत सदस्य यांनी या प्रक्रियेत सहभाग घ्यावा, असे आवाहन प्रकाश आबिटकर यांनी केले.

# बिबट्याच्या बंदोबस्तासाठी मोगराळे ग्रामस्थ आक्रमक

## १ मे रोजी 'रास्ता रोको'चा इशारा

सातारा

**कायम** दुष्काळी समजल्या जाणाऱ्या उत्तर माण तालुक्यातील अनेक गावांत गेल्या काही दिवसांपासून बिबट्याचा वावर वाढत आहे. यामुळे ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. वनविभागाने या बिबट्याचा त्वरित बंदोबस्त करावा, अन्यथा १ मे रोजी मोगराळे येथे 'रास्ता रोको' आंदोलन करण्याचा इशारा राष्ट्रीय समाज पक्षाचे माण तालुकाध्यक्ष शिवाजीराव बरकडे यांनी दिला आहे. यासंदर्भात शिवाजीराव बरकडे यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने वनविभागाला लेखी निवेदन दिले आहे. यावेळी तालुक्यातील पदाधिकारी आणि ग्रामस्थ उपस्थित होते. या निवेदनात म्हटले आहे की, उत्तर माणमधील अनेक गावांत बिबट्याने धुमाकूळ घातला असून, दररोज पाळीव प्राणी, कुत्रे आणि लहान जनावरे फस्त केली जात आहेत. प्रामुख्याने मोगराळे परिसरातील सोलर कंपनीच्या क्षेत्रात बिबट्याचा वावर अधिक आहे. बिबट्या आता मानवी वस्तीच्या अगदी जवळ आल्याने शेतकरी आणि शेतमजुरांना शेतात जाणे कठीण झाले आहे. वारंवार मागणी करूनही वन विभाग ठोस पावले उचलत नसल्याने नागरिकांमध्ये संताप व्यक्त होत आहे.

# ओशिवरातील नामांकित शाळा अचानक बंद केल्याने खळबळ

## शेकडो विद्यार्थ्यांचे भवितव्य टांगणीला

मुंबई

**पश्चिम** उपनगरातील ओशिवरा येथील नामांकित सिटी इंटरनॅशनल स्कूलने अचानक शाळा बंद करण्याचा अघोषित निर्णय घेतला आहे. त्यामुळे सुमारे ६८८ विद्यार्थ्यांचे भवितव्य टांगणीला लागले आहे. जमीनदारासोबतचा वाद आणि भाडेवाढीच्या कारणास्तव हा निर्णय घेण्यात आल्याचे शाळा व्यवस्थापनाने म्हटले आहे.

ओशिवरा येथे २००३ पासून सिटी इंटरनॅशनल ही शाळा सुरू आहे. परिसरात या शाळेचा नावलौकिकही चांगला आहे. या शाळेत साधारण ६६८ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. सुरुवातीला ४० हजार रुपये देणगी घेऊन विद्यार्थ्यांना दहावीपर्यंत शिक्षण देण्याचे आश्वासन दिले गेले होते. मात्र, आता अचानक शाळा बंद करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यासाठी जागा मालकाने केलेली भाडेवाढ हे कारण पुढे केले आहे.

पालकांनी असा आरोप केला आहे की, शाळा सोडल्याचा दाखला देण्याऐवजी शाळा प्रशासन पालकांना ई-मेलवर 'ट्रान्सफर सर्टिफिकेट' पाठवत आहे.शाळा बंद झाल्याची अधिकृत नोंद टाळण्यासाठी प्रशासन असे करत आहे. पालकांकडून घेतलेली मोठी रक्कम आणि फी याबाबत शाळा प्रशासनाने कोणतीही स्पष्ट भूमिका केलेली नाही. शाळा अचानक बंद करण्याचा निर्णय शाळा प्रशासनाने घेतल्यामुळे आता या विद्यार्थ्यांना इतर शाळांमध्ये प्रवेश कसा मिळणार, असा प्रश्न पालकांसमोर उभा ठाकला आहे.

# यावर्षीही पाऊस लवकर येणार

पान १ वरून

लवकर येण्याचा कल दिसून येत आहे, ज्याचा फटका बऱ्याचदा शेतीला बसतो. परंतु यंदाचा पाऊस लवकर येणार असल्याने उष्णतेपासून मोठा दिलासा मिळण्याची शक्यता आहे. अंदमान आणि निकोबार बेटांवर ३० ते ६० मिमी अधिक पाऊस पडण्याची शक्यता आहे. अंदमानच्या उत्तरेला उष्णकटिबंधीय प्रणाली तयार होण्याची २० ते ४० टक्के शक्यता असल्याने ही स्थिती मान्सूनला पुढे ढकलण्यासाठी बूस्टरचे काम करणार आहे. यंदा मान्सून आगमनावेळी एल निनोचा प्रभाव नसल्याने हे भारतातील मान्सूनसाठी सकारात्मक संकेत मानले जात आहेत.

# अशोक खरातला सहाव्या गुन्ह्यात १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी

पान १ वरून

भोंदू अशोक खरातने महसूल अधिकाऱ्यांच्या मदतीने गैरव्यवहार केले आहेत, असाही आरोप आहे. याबद्दल बोलताना महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले की, भोंदू खरातला मदत करणाऱ्या महसूल अधिकाऱ्यावर कारवाई केली जाईल. याबाबत आमच्याकडे अंतिम अहवाल येणार आहे, तो आल्यानंतर कडक कारवाई करणार आहोत. या प्रकरणात आणखी कोणी आमच्या खात्याचे सहभागी असेल तर आम्हाला माहिती पाठवा. इतर खात्यांचे असेल तरीही माहिती पाठवा.

# २०२७ ची डिजिटल जनगणना! १.२० कोटी घरांची नोंदणी पूर्ण

पान १ वरून – प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर त्यांना एक विशेष आयडी मिळेल. नंतर कर्मचारी घरी आल्यानंतर हा आयडी दाखवून माहितीची पुष्टी करता येणार आहे. त्यामुळे पुन्हा माहिती देण्याची गरज भासणार नाही. याशिवाय 'मन की बात'मध्ये मोदींनी भारताच्या पवनऊर्जा क्षेत्रातील प्रगतीचाही उल्लेख केला. भारताने पवन ऊर्जा क्षेत्रात मोठी कामगिरी केली आहे. देशाची पवन ऊर्जा निर्मिती क्षमता आता ५६ गिगावॅटपेक्षा अधिक झाली आहे. गेल्या एका वर्षातच ६ गिगावॅट नवीन क्षमता वाढवण्यात आली. यात गुजरात, महाराष्ट्र, राजस्थान व तामिळनाडू ही राज्य आहेत. २०१७ मध्ये बांबूला झाडांच्या श्रेणीतून बाहेर काढण्यासाठी कायद्यात बदल करण्यात आला. त्यानंतर संपूर्ण ईशान्य भारतात बांबू क्षेत्र झपाट्याने वाढत असून, रोजगाराच्या नव्या संधी निर्माण झाल्या आहेत.

# पीएमपीएमएल बस चोरी प्रकरण! आरोपीला अटक करून गुन्हा दाखल

**पुणे** – शहरात पुणे महानगर परिवहन महामंडळ लिमिटेड (पीएमपीएमएल) बस चोरीप्रकरणी आरोपीला अटक करून त्याच्याविरोधात गुन्हा दाखल केला. या घटनेमुळे शहरात मोठी खळबळ उडाली. तर सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेच्या सुरक्षेवरही प्रश्नचिन्ह निर्माण झाले. पीएमपीएमएलची बस परवानगीशिवाय चालवत नेल्याप्रकरणी आरोपी गोपालसिंग राणा (२०) विरोधात शिवाजीनगर पोलीस ठाण्यात मोटार वाहन कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ही घटना सायंकाळी ५ वाजताच्या सुमारास डेंगळे पूल परिसरात झाली.


MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**Public Notice**

The following Power consumer and area covered under 100kV Khopoli Substation in EHV (O&M) Dn., Panvel are informed that, the power supply of the following power lines will be shut down on **Tuesday Dt. 28.04.2026** for 22kV main Bus Rph damaged Conductor replacement work & Bus Isolator maintenance work. Please co-operate.

| Sr. No. | Substation | | Feeder No. | Date & Time | Areas |
|---|---|---|---|---|---|
| 1. | 100/22kV Khopoli Substation | 22kV Bus section-2 | 22kV Khopoli Industrial | On dt. 28.04.2026 From 10:00 Hrs. to 18:00 Hrs. | Khopoli MIDC area and some Khopoli city area like wasrang |
| 2. | | | 22kV Shilphata | | Shilphata residential and commercial area and nearby MIDC and villages |
| 3. | | | 22kV Kharsundi | | Khalapur Industrial Area and surronding villages |
| 4. | | | 22kV Sawroli | | 22kV Savroli Switching Station |
| 5. | | | 22kV Rural | | Pali phata and nearby villages |

Sd/-
EXECUTIVE ENGINEER
E.H.V.(O&M) DN. PANVEL




नवाकाळ
• मुंबई । सोमवार २७ एप्रिल, २०२६ • पान -८

## मुंबई-पुण्याहून अयोध्येसाठी अमृत भारत एक्स्प्रेस



**मुंबई -** मुंबई आणि पुणे येथून अयोध्येसाठी अमृत भारत एक्स्प्रेसची घोषणा झाली आहे. मंगळवार २८ एप्रिलपासून या गाडीची सेवा सुरू होणार असल्याची माहिती रेल्वे प्रशासनाने दिली आहे. मुंबई-अयोध्या ही ट्रेन लोकमान्य टिळक टर्मिनसपासून अयोध्येच्या कॅन्ट स्थानकापर्यंत धावणार आहे. या प्रवासात प्रयागराज, माणिकपूर, सतना, जबलपूर आणि इटारसी हे थांबे असतील. हडपसर ते वाराणसी ही दुसरी ट्रेन एकूण १८ स्थानकांवर थांबणार आहे. त्यामध्ये ज्ञानपूर रोड, प्रयागराज, फतेहपूर, गोविंदपुरी, ओराई, झाशी, बिना, राणी कमलापती, नर्मदापुरम, इटारसी, हरदा, खांडवा, भुसावळ, जळगाव, मनमाड, कोपरगाव, अहिल्यानगर आणि दौंड कॉर्ड लाईन या स्थानकांचा समावेश आहे. या गाडीत स्लीपर आणि जनरल सेकंड क्लाससह एकूण २२ डबे असतील.

## आंतरराष्ट्रीय ड्रग माफिया सलीम डोलाला इस्तंबूलमध्ये अटक! दाऊद इब्राहिमला मोठा धक्का

■ मुंबई

**आंतरराष्ट्रीय** अमली पदार्थ तस्करी रॅकेटचा प्रमुख सूत्रधार मानला जाणारा आणि भारताचा कुख्यात

सविस्तर वाचण्यासाठी व शेअर करण्यासाठी हा क्युआर कोड स्कॅन करा

ड्रग माफिया सलीम डोला याला तुर्कीमध्ये अटक करण्यात आली आहे. भारतीय सुरक्षा यंत्रणांनी याला दुजोरा दिला आहे. तुर्कीच्या सुरक्षा यंत्रणांनी इस्तंबूलमध्ये एक मोठी मोहीम राबवून भारतीय ड्रग माफिया सलीम डोलाच्या मुसक्या बांधल्या. सलीम हा कराचीत असलेल्या



दाऊद इब्राहिमचा जवळचा सहकारी म्हणून ओळखला जात होता.

मूळचा मुंबईतील डोंगरीतील असलेला सलीम डोला याला तुर्की देशामध्ये अटक केली असल्याने त्याचे भारताकडे प्रत्यार्पण होणार की नाही याबाबत साशंकता आहे. त्याच्याविरुद्ध रेड कॉर्नर नोटीस देखील जारी केली होती. काही महिन्यांपूर्वी सांगली जिल्ह्यात एमडी ड्रगच्या एका कारखान्यावर पोलिसांनी धाड मारली होती. त्यावेळी २५० कोटींचे ड्रग जप्त केले होते. तेव्हापासून सलीम फरार झाला होता. केंद्रीय अन्वेषण विभागाने जारी केलेल्या इंटरपोल अलर्टनंतर सलीम डोलाला ताब्यात घेण्यात आले. सलीम हा दाऊदच्या अमली पदार्थ व्यवसायातील सर्व गुप्त माहिती असलेला व्यक्ती मानला जातो.

## मराठी सक्ती संदर्भात आज रिक्षा-टॅक्सी संघटनेची सभा

■ मुंबई

**राज्यात** ऑटो-टॅक्सी चालकांसाठी व्यवहारिक मराठी अनिवार्य करण्याच्या प्रस्तावावरून वाद निर्माण झाला असून, या निर्णयाविरोधात रिक्षा-टॅक्सी संघटना आक्रमक झाली आहे. उद्या २७ एप्रिलला गोरेगाव येथील केशव गोरे स्मारक ट्रस्ट हॉलमध्ये चालकांची महत्त्वाची सभा आयोजित करण्यात आली आहे. परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी या संदर्भात कामगार नेते शशांक राव आणि संजय निरुपम यांच्यासह विविध संघटनांच्या प्रतिनिधींशी बैठक घेतली. मराठी लिहिता-वाचता न येणाऱ्या चालकांचे परवाने रद्द करण्याचा निर्णय अन्यायकारक व बेकायदेशीर आहे, असे मत यावेळी रिक्षा-टॅक्सी चालकांच्या वतीने मांडण्यात आले. या निर्णयाविरोधात पुढील भूमिका ठरवण्यासाठी ही सभा बोलावण्यात आली असून, मोठ्या संख्येने चालक उपस्थित राहणार आहेत.

## अजित पवारांच्या फोटोशेजारी संशयास्पद पूजा साहित्य? मिटकरी यांचा दावा

■ मुंबई

**विमान** अपघातात निधन झालेले उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या फोटोजवळ अघोरी पूजा झाल्याचा संशय अजित पवार गटाचे माजी आमदार अमोल मिटकरी यांनी व्यक्त केला. यासंदर्भातील फोटो शेअर करून त्यांनी एक्स पोस्ट केली आहे.

अमोल मिटकरी यांनी एक्सवर लिहिले आहे की, काल रात्री गोजुबावी या ठिकाणी दादांच्या प्रतिमेला काही लोक



दिवा बत्ती करण्यासाठी गेले असता त्यांना पूजेच्या ताटात २ लिंबू टाचण्या टोचून ठेवलेल्या स्थितीत आढळल्या. हे कुणी जाणीवपूर्वक करते की अघोरी पूजा प्रकार?

मिटकरी यांनी यापूर्वीही पवार कुटुंबाशी संबंधित विद्याप्रतिष्ठान शिक्षण संस्थेच्या परिसरातील अघोरी पूजेच्या संदर्भातील जुने फोटो पोस्ट केले होते. याशिवाय स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूक काळात अजित पवार यांच्या सहयोग सोसायटी निवासस्थान परिसरात अघोरी पूजेचे व्हिडिओ व्हायरल झाले होते.

## शिवराय कधी थकले नाहीत संजय राऊत यांची प्रतिक्रिया

■ मुंबई

**हिंदवी** स्वराज्य स्थापन करण्याचा शिवरायांचा विचार भाजपा आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघाला कधीच रुचला नाही. त्यामुळे बुवा-बाबांच्या तोंडून शिवरायांचा अपमान करून घेण्याचे कारस्थान केले जात आहे. शिवाजी महाराज कधी थकले नाहीत. ते शुरासारखे लढत राहिले, अशी प्रतिक्रिया उबाठाचे प्रवक्ते संजय राऊत यांनी बागेश्वर बाबांनी छत्रपती शिवाजी महाराजांबाबत केलेल्या विधानावर दिली.

महाराजांनी अफजलखानाचा वध केला, शाहिस्तेखानाची बोटे छाटली, हा इतिहास बहुधा बागेश्वर बाबांना माहीत नसावा. त्यामुळे ते अशाप्रकारचे वाह्यात वक्तव्य करू शकले. शिवाजी महाराज लढाया करून थकले होते असे या बाबाला कोणी सांगितले कळायला मार्ग नाही. इतिहासाची मोडतोड करण्याचा भाजपाची ही जुनी खेळी आहे, असे राऊत म्हणाले. बागेश्वर बाबासारखी व्यक्ती महाराष्ट्रात येऊन जाहीर सभेतून असे वक्तव्य करतात हे निंदनीय आहे. बागेश्वर बाबा जेव्हा बोलत होते तेव्हा मंचावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, सरसंघचालक मोहन भागवत आदि मान्यवर उपस्थित होते.

## महामार्गांवरील खड्डे बुजवण्यासाठी मुंबई मनपाच्या १०५ कोटींच्या निविदा

■ मुंबई

**पावसाळ्याच्या** तोंडावर पश्चिम द्रुतगती महामार्ग, पूर्व द्रुतगती महामार्ग आणि पूर्व मुक्त मार्गावरील (ईस्टर्न फ्री वे) खड्डे बुजवण्यासाठी मुंबई महापालिकेने निविदा जाहीर केल्या आहेत. या कामाचा अंदाजे खर्च १०५ कोटी रुपये आहे.

हे काम वेगवेगळ्या टप्प्यांमध्ये विभागण्यात आले आहे. त्यामध्ये पश्चिम आणि पूर्व द्रुतगती मार्गासाठी प्रत्येकी ३० कोटी रुपयांच्या तरतुदीचा समावेश आहे. या व्यतिरिक्त नऊ मीटरहून कमी रुंदीच्या रस्त्यांच्या दुरुस्तीसाठी सात निविदा आणि काँक्रिटीकरण न झालेल्या रुंद रस्त्यांसाठी आणखी



सात निविदा काढण्यात आल्या आहेत. खड्डे बुजवण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या कोल्ड मिक्ससाठी स्वतंत्र निविदा काढण्यात आली आहे. गेल्या वर्षी मुंबईतील रस्त्यांवरील खड्डे बुजवण्याच्या कामासाठी महापालिकेने १५४ कोटी रुपये खर्च केले होते. त्या तुलनेत यावर्षी रस्त्यांच्या दुरुस्तीसाठी कमी खर्च करावा लागणार आहे. याचे कारण म्हणजे पालिकेने १७ हजार कोटी रुपये खर्च करून शहरातील बहुतांश रस्त्यांचे काँक्रिटीकरण केले आहे.

## लोणेरे तरुणीच्या हत्याकांडातील मुख्य आरोपीला अटक केली

■ रायगड

**महाराष्ट्राला** हादरवून सोडणाऱ्या लोणेरे येथील तरुणी हत्याकांड प्रकरणातील मुख्य आरोपी अनिस मोहम्मद खान मालदार याला रायगड पोलिसांनी सहा दिवसांनंतर अटक केली.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, त्याचा शोध घेण्यासाठी स्थानिक गुन्हे अन्वेषण विभाग तसेच विविध पोलीस पथके रात्रंदिवस काम करत होती. यादरम्यान आरोपी वारंवार ठिकाण बदलत होता. मात्र तांत्रिक विश्लेषण, सीडीआर तपास आणि गुप्त माहितीच्या आधारे पोलिसांनी नवी मुंबई व ठाणे परिसरात सापळा रचून त्याला ताब्यात घेतले.

मागील सोमवारी लोणेरे येथील एका लॉजमध्ये २२ वर्षीय तरुणीचा मृतदेह अत्यंत विदारक अवस्थेत आढळला होता. आरोपीने तरुणीला लॉजवर नेले. त्यानंतर तिच्यावर लैंगिक अत्याचार करून हातपाय बांधले आणि धारदार शस्त्राने वार करत हत्या केली. त्यानंतर आरोपी घटनास्थळावरून फरार झाला होता.

## दिल्ली विमानतळावर मोठा अपघात टळला! उड्डाणाआधी इंजिनला आग

■ नवी दिल्ली

**इंदिरा** गांधी आंतरराष्ट्रीय विमानतळ येथे काल रात्री मोठा विमान अपघात थोडक्यात टळला. स्विस एअरलाईन्सच्या झुरिचला जाणाऱ्या एलएक्स १४७ (एअरबस ए३३०) विमानाच्या इंजिनाला उड्डाणापूर्वी आग लागली. या विमानात २३२ प्रवासी आणि ४ लहान मुले होती. सुदैवाने वैमानिकाच्या प्रसंगावधनामुळे मोठा अनर्थ टळला. या घटनेत सहा प्रवासी किरकोळ जखमी झाले.

### २३२ प्रवासी थोडक्यात बचावले

काल रात्री १.०८ च्या सुमारास विमान धावपट्टीवर उड्डाणासाठी सज्ज असताना इंजिनमध्ये तांत्रिक बिघाड होऊन अचानक आग लागली. परिस्थितीचे गांभीर्य ओळखून वैमानिकाने तत्काळ टेकऑफ रद्द करत इमर्जन्सी ब्रेक लावले. त्यानंतर अग्निशमन दलाच्या गाड्या तत्काळ घटनास्थळी दाखल झाल्या. विमानात आग लागल्याचे समजताच प्रवाशांमध्ये घबराट पसरली.

विमान थांबताच सर्व प्रवाशांना इमर्जन्सी स्लाईडच्या मदतीने सुरक्षित बाहेर काढण्यात आले. या धावपळीत सहा प्रवासी किरकोळ जखमी झाले. घटनेनंतर एअरलाईन्सने विशेष टास्क फोर्स स्थापन केली असून नागरी विमान वाहतूक महासंचालनालयाने चौकशीचे आदेश दिले आहेत.

## राहुरीत निकालाआधीच कर्डिलेंच्या विजयाचे बॅनर

■ राहुरी

**राहुरी** विधानसभा पोटनिवडणुकीचा निकाल ४ मे रोजी जाहीर होणार आहे. परंतु भाजपाचे उमेदवार अक्षय शिवाजी कर्डिले यांच्या




विजयाचे बॅनर राहुरी आणि अहिल्यानगर तालुक्यात आधीच झळकू लागले आहेत. या बॅनर्सची जोरदार चर्चा रंगली आहे. ४ मे रोजी अक्षय कर्डिले यांचा वाढदिवसही असल्याने समर्थकांकडून त्यांना विजय आणि वाढदिवसाच्या शुभेच्छा देणारे बॅनर लावण्यात आले आहेत. या पोस्टरवर 'आमच्या हरण्याचा कुठे आवाज होता. जन्मताच माथी माझ्या गुलाल होता', असा मजकूर आहे.

## लाडकी बहीण योजनेत गैरप्रकार अपात्रांकडून ११ कोटींची वसुली

■ मुंबई

**महाराष्ट्र** शासनाच्या लाडकी बहीण योजनेतील गैरप्रकार उघड झाल्यानंतर सरकारने आतापर्यंत सुमारे ११ कोटी रुपये अपात्र लाभार्थ्यांकडून वसूल केले आहेत. यात मोठ्या प्रमाणात शासकीय कर्मचाऱ्यांचा समावेश असून, पात्र नसतानाही त्यांनी योजनेचा लाभ घेतला आहे.

कारवाई सुरू होताच काही लाभार्थ्यांनी स्वेच्छेने रक्कम परत केली, तर काहींनी योजनेतून नावे काढून घेतली. मात्र, ओळख पटूनही पैसे न परत करणाऱ्यांकडून थेट वसुली केली जात आहे. काही प्रकरणांमध्ये पगारातून कपात, वेतन रोखणे, बढती थांबवणे आणि वार्षिक गोपनीय अहवालावर परिणाम करणे अशा शिस्तभंगात्मक कारवाया करण्यात येत आहेत.

सुरुवातीला सुमारे २,४०० शासकीय कर्मचाऱ्यांनी लाभ घेतल्याचे समोर आले होते. मात्र माहिती अधिकारातून तब्बल १२,९१५ कर्मचाऱ्यांनी दरमहा १,५०० रुपयांचा लाभ घेतल्याची धक्कादायक बाब उघड झाली. महिला व बाल विकास विभागाच्या २९ जुलै २०२५ च्या आदेशानंतर कारवाईला वेग आला. त्यानंतर ग्रामीण विकास विभागाने जिल्हा परिषदांना वसुली आणि शिस्तभंगाची कारवाई करण्याचे निर्देश दिले. याआधी ऑक्टोबरमध्ये १६४.५२ कोटी रुपयांचे चुकीचे वितरण झाल्याचेही उघड झाले होते.

## टीसीएस प्रकरणातील निदा खान आरोपींच्या सतत संपर्कात होती

■ नाशिक

**टीसीएस** धर्मांतर प्रकरणातील मुख्य संशयित निदा खान अटकेत असलेल्या आरोपींच्या सतत संपर्कात असल्याची माहिती आहे. याबाबत आरोपी दानिश शेखच्या मोबाईलमधूनही संशयास्पद फोटो, व्हिडिओ आणि चॅट्स हाती लागल्याने या प्रकरणात आणखी धक्कादायक खुलासे होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. दरम्यान फरार निदा खानच्या जामीन अर्जावर २७ एप्रिल रोजी न्यायालयात सुनावणी होणार असल्याने त्याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. तपास यंत्रणांकडून मिळालेल्या माहितीनुसार, निदा खानने कंपनीतील नोकरी सोडल्यानंतरही इतर आरोपींसोबत संपर्क कायम ठेवला होता. या संपर्कातून केवळ धर्मांतर नव्हे, तर फसवणुकीचा व्यापक कट रचल्याचा संशय आहे. याशिवाय दानिश शेखने मोबाईलमधील प्रत्येक फाईल, ॲप आणि चॅटसाठी वेगवेगळे पासवर्ड ठेवले होते.

## शेतकरी कर्जमाफीची लवकरच घोषणा होणार

■ मुंबई

**महायुती** सरकारने जाहीर केलेल्या पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर कर्जमाफी योजनेचा मार्ग मोकळा झाल्याची माहिती आहे. या योजनेअंतर्गत राज्यातील तब्बल ३५ ते ४० लाख शेतकऱ्यांना थेट लाभ मिळण्याची शक्यता आहे. या योजनेनुसार शेतकऱ्यांचे दोन लाख रुपयांपर्यंतचे थकीत पीककर्ज माफ केले जाणार आहे. तसेच जे शेतकरी नियमितपणे कर्जफेड करत आहेत, अशा कर्जदारांना ५० हजार रुपयांचे प्रोत्साहन अनुदान देण्याचाही निर्णय सरकारने घेतल्याचे सुत्रांनी सांगितले.

या योजनेमुळे राज्याच्या तिजोरीवर सुमारे २५ ते २७ हजार कोटी रुपयांचा आर्थिक भार पडू शकतो. परदेशी समितीच्या अहवालात सुमारे ३५ लाख शेतकरी कर्जमाफीसाठी पात्र ठरू शकतात. तर या योजनेत दोन लाखांपेक्षा अधिक कर्ज असलेल्या शेतकऱ्यांनाही अटींसह लाभ मिळू शकतो. अशा शेतकऱ्यांनी दोन लाखांवरील अतिरिक्त रक्कम भरल्यानंतर दोन लाख रुपयांच्या कर्जमाफीचा लाभ घेता येणार आहे. कर्जमाफीसाठी ३० जूनपर्यंत मुदत निश्चित करण्यात आल्याची चर्चा असली, तरी त्यापूर्वीच या योजनेची अंमलबजावणी सुरू होण्याची शक्यता आहे.

दरम्यान, जयकुमार गोरे यांनीही यासंदर्भात प्रतिक्रिया देताना सांगितले की, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अधिवेशनातच दोन लाखांपर्यंत थकीत कर्ज माफ करण्याचा निर्णय घेतला आहे. तसेच नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना ५० हजार रुपयांचे अनुदान देण्याची प्रक्रिया सुरू आहे. सरकारने निवडणुकीत दिलेला शब्द पूर्ण करण्याची भूमिका घेतली आहे.

## मुख्यमंत्र्यांचा फोटो मॉर्फ प्रकरणी राष्ट्रवादीच्या मीडिया प्रमुखाला अटक

■ पिंपरी-चिंचवड

**पिंपरी-चिंचवड** शहरात समाजमाध्यमांवर मुख्यमंत्र्यांचा फोटो मॉर्फ करून वादग्रस्त पोस्ट केल्या प्रकरणी सायबर पोलिसांनी राष्ट्रवादी शरद पवार गटाचे सोशल मीडिया राज्य प्रमुख महादेव बालगुडे यांना अटक केली आहे.

या प्रकरणी एका वकिलाने सायबर पोलिसांकडे लेखी तक्रार दाखल केली होती. तक्रारीमध्ये मुख्यमंत्र्यांची प्रतिमा मलीन करणे आणि देशविघातक शक्तींचे समर्थन करणे अशा मुद्यांवर भर दिला होता. सायबर पोलिसांनी तक्रारीची दखल घेत तत्काळ गुन्हा नोंदवून ही कारवाई केली. महादेव बालगुडे यांच्यावर केवळ मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या बदनामीचाच नाही, तर नक्षलवादी विचारांच्या प्रसाराचाही गंभीर आरोप आहे. त्यांनी नक्षलवादी नेता हिडमा याचे



उदात्तीकरण करणारी पोस्ट सोशल मीडियावर शेअर केल्याचा ठपकाही त्यांच्यावर ठेवण्यात आला आहे. जबाबदार पदावर असताना अशा प्रकारच्या आक्षेपार्ह पोस्ट केल्याने त्यांच्या अडचणीत वाढ झाली आहे.

## बागेश्वर बाबांच्या विरोधात अमरावती, जळगावात आंदोलन

■ मुंबई

**बागेश्वरधामचे** धीरेंद्र कृष्ण शास्त्री उर्फ बागेश्वर बाबा यांनी छत्रपती शिवाजी महाराजांवर वादग्रस्त वक्तव्य केल्यानंतर आज अमरावती, चाळीसगाव, जळगाव अशा अनेक ठिकाणी संभाजी ब्रिगेड, काँग्रेस या पुरोगामी संघटनांनी त्यांच्या विरोधात आंदोलने करत त्यांच्या अटकेची बातमी केली.

अमरावतीत काँग्रेस आंदोलकांनी बागेश्वर बाबांच्या फोटोला जोडे मारले. आंदोलकांनी म्हटले की, भोंदू बागेश्वरने छत्रपती शिवाजी महाराज यांच्याबद्दल



खोटा इतिहास महाराष्ट्राला आणि देशाला दाखवण्याचा प्रयत्न केला. डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर, छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा गांधी यांची बदनामी करायची. यामध्ये लोकांनी विरोध नाही केला तर मग त्यांच्या स्लिपर सेलच्या माध्यमातून दाखवलेला खोटा इतिहास खरा आहे हे दाखवण्याचा प्रयत्न करायचा. शिवाजी महाराज कधीच थकले नाही ते पूर्ण देशाला प्रेरणा देणारे महापुरुष होते. म्हणून हे भोंदू बागेश्वर महाराज याच्यावर गुन्हा दाखल झाला पाहिजे.

दरम्यान, अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे अध्यक्ष श्याम मानव यांनी बागेश्वर बाबा आणि माजी सरन्यायाधीश भूषण गवई यांच्यावर टीका केली. श्याम मानव म्हणाले की, माजी सरन्यायाधीश भूषण गवई हे धीरेंद्र शास्त्री यांच्या पाया पडण्यास गेले. ते पाहून मला प्रचंड धक्का बसला. भूषण गवई स्वत:ला मी आंबेडकरी विचारांचा असल्याचे सांगतात. आंबेडकरी विचारांचे मी दूध प्यायलो आहे. पण ते जर धीरेंद्र शास्त्री महाराजांच्या पाया पडून आशीर्वाद घेत असतील तर आता तुम्ही यापुढे डॉ. आंबेडकरांचे नाव कधीही घ्यायचे नाही.

तो अधिकार तुम्ही गमावला आहे. त्यावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस प्रतिक्रिया देताना म्हणाले की, भूषण गवईंनी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांचे नाव घेऊ नये असे सांगणारे श्याम मानव कोण आहेत? ते सर्टिफिकेट वाटणारे आहेत का? श्याम मानव अलिकडच्या काळात फक्त प्रसिद्धीसाठी बोलतात.

## गोव्यातील वजे नदीपात्रात बुडून दोन चिमुकल्यांचा मृत्यू

■ मडगाव

**दक्षिण** गोवा जिल्ह्यातील काणकोण तालुक्यातील भाटपाल परिसरातील वजे नदीत काल सकाळी दोन चिमकल्यांचा बुडून दुर्दैवी मृत्यू झाला. ध्रुव उदय वडर (५) आणि व ऋग्वेद ऊर्फ ऋत्विक धनंजय नाईक (९) अशी या मृत्यू झालेल्या चिमुकल्यांची नावे आहेत. शाळेला सुट्टी लागल्याने नवे वाडे-भाटपाल येथील ऋत्विक काही दिवसांपूर्वीच धुपेमळ येथे आपल्या मावशीकडे आला होता. तर नंदनगदा-कारवार येथील ध्रुव हा सुद्धा आपल्या नातेवाईकांकडे आला होता. दोघेही खेळताना आंघोळीसाठी नदीत उतरले होते. यावेळी नदीच्या खोलपात्राचा अंदाज न आल्याने दोघेही बुडू लागले आणि काही क्षणात बेपत्ता झाले. हे दृश्य त्याच ठिकाणी असलेल्या रोहन नावाच्या मुलाने पाहिल्यानंतर त्याने आजूबाजूच्या लोकांना ओरडून जमा केले.

## मिसिंग लिंकमुळे अपघात शून्यावर येतील! एकनाथ शिंदेंचे वक्तव्य

■ मुंबई

**मुंबई-पुणे** द्रुतगती मार्गावरील बहुप्रतीक्षित 'मिसिंग लिंक' प्रकल्प आता अंतिम टप्प्यात पोहोचला असून, १ मे रोजी या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाचे उद्घाटन होणार आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ यांनी आज प्रकल्पाची पाहणी करून कामाचा आढावा घेतला. यावेळी ते म्हणाले की, त्यांनी हा प्रकल्प अभियांत्रिकी आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा चमत्कार आहे. यामुळे अपघात शून्यावर येतील.

उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले की, खालापूर ते सिंहगड दरम्यान सुमारे साडेदहा किलोमीटर लांबीचा बोगदा तयार करण्यात आला आहे. या प्रकल्पातील बोगदा हा जगातील सर्वाधिक रुंद बोगद्यांपैकी एक असून, व्हायाडक्टवरील १८२ मीटर उंच बोगदा भारतातील सर्वात उंच आहे. मिसिंग लिंक प्रकल्पामुळे मुंबई-पुणे प्रवासात अर्धा ते पाऊण तासांची बचत होणार आहे. घाट विभागातील वाहतूक कोंडी मोठ्या प्रमाणावर कमी होईल. तसेच इंधन बचत, प्रदूषणात घट आणि अपघातांचे प्रमाणही शून्यावर येईल. या नव्या बोगद्याकरिता स्वतंत्र टोल आकारला जाणार नाही.